दैनिक
# सिंधुदुर्ग समाचार
ग्रामीण जनतेचे एकमेव लोकप्रिय मराठी दैनिक
सिंधुदुर्ग-मुंबई
www. sindhudurgsamachar. in
T-2/RNP/SDG-06/2024-2026
संस्थापक : प्राचार्य मुकुंदराव कदम
नोंदणी क्र.एमएलव्ही/२१/०९ रजिस्ट्रेशन क्र. ४३७११/८५ ● शुक्रवार दि.७ नोव्हेंबर २०२५ ● पाने ४ ● वर्ष ४० ● अंक ६९० ● किंमत १ रू ● सिंधुदुर्ग, मुंबई, रत्नागिरी, रायगड, गोवा, पुणे

## थोडक्यात



### कणकवली लवकरच सीएनजी पंप सुरु

**कणकवली । प्रतिनिधी**

कणकवली वासियांसाठी शहरातील लवकरच सीएनजी पंप सुरु होणार आहे. शहरातील बस स्टँडच्या शेजारी असलेल्या पेट्रोल पंपावर गुरुवारी सीएनजी भरण्यासाठी यशस्वी चाचणी पार पडली. सकाळी १० ते दुपारी १२ पर्यंत सीएनजी गाड्यांमध्ये भरण्यात आला.त्यामुळे लवकरच लवकर कणकवली शहरांमध्ये सीएनजी पेट्रोल पंप सुरु होणार आहे. त्यामुळे कणकवली शहरातील सीएनजी वाहन चालकांसाठी ही आनंदाची बातमी आहे. कारण रिक्षा व्यवसायिक आणि कारचालक हे सीएनजी भरण्यासाठी सिंधुदुर्ग नगरी, फोंडाघाट, तरळे या ठिकाणी जातात. पण आता शहरातील सीएनजी पंप काही दिवसात सुरू होणार असल्याचे वाहन चालकांना दिलासा मिळणार आहे.



### वेंगुर्ले नगरपरिषद राष्ट्रवादी काँग्रेस स्वबळावर लढणार

**वेंगुर्ले । प्रतिनिधी**

वेंगुर्ले नगरपरिषद निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी वेंगुर्ला(अजितदादा पवार गट) स्वबळावर लढणार असल्याचे एकमताने ठरविण्यात आले. वेंगुर्ले कॅम्प येथील राष्ट्रवादी काँग्रेस कार्यालयात तालुकाध्यक्ष संदीप पेडणेकर यांच्या अध्यक्षतेखाली राष्ट्रवादी काँग्रेस पदाधिकारी यांची बैठक पार पडली यावेळी महिला जिल्हाध्यक्ष प्रज्ञा परब, जिल्हा सचिव सुशील चमणकर, युवा कार्यकर्ते अनंतराज पाटकर, शहरअध्यक्ष सुरज परब, तालुका सरचिटणीस संतोष राऊळ, महिला तालुकाध्यक्ष ऋतुजा शेटकर, शहराध्यक्ष सुचिता परब, ग्रामपंचायत सदस्य संदिप सातार्डेकर, राजेंद्र आमरे, तालुका युवा अध्यक्ष गजानन कुंभार, ओबीसी उपाध्यक्ष चंद्रशेखर मांजरेकर, सुप्रिया जाधव आदी उपस्थित होते. यावेळी झालेल्या बैठकीत आगामी होणाऱ्या वेंगुर्ले नगरपरिषद निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष स्वबळावर लढणार असून सर्व पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेसच्या अधिकृत उमेदवाराचे काम करण्याची सूचना देण्यात आली.

### तायक्वांदो स्पर्धेत प्रज्योती जाधवला कास्यपदक

**कणकवली । वार्ताहर**



बंगळुरू येथे झालेल्या राष्ट्रीय ज्युनिअर तायक्वांदो स्पर्धेत येथील प्रज्योती श्रीकांत जाधव हिने कास्यपदक पटकावले आहे. ३१ ऑक्टोबर ते २ नोव्हेंबर या कालावधीत राजीव गांधी स्पोर्ट्स कॉम्प्लेक्स, बंगळुरू येथे पार पडलेल्या ४२व्या राष्ट्रीय ज्युनिअर क्योरेगी व १५व्या पुमसे तायक्वांदो स्पर्धेत प्रज्योतीने ५९ ते ६३ किलो वजनी गटात उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करत हे यश मिळवले. प्रज्योतीने यापूर्वी शालेय राज्यस्तरीय स्पर्धेत सुवर्णपदक पटकावले असून, तिची आता जम्मू-काश्मीर येथे होणाऱ्या राष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे. ती सध्या माध्यमिक विद्यामंदिर, कनेडी येथे इयत्ता बारावी (सायन्स) मध्ये शिक्षण घेत आहे. प्रज्योती नगर वाचनालय येथील मास्टर स्पोर्ट तायक्वांदो अकॅडमीमध्ये राष्ट्रीय तायक्वांदो प्रशिक्षक व पंच एकनाथ धनवटे यांच्या मार्गदर्शनाखाली प्रशिक्षण घेत आहे.


दैनिक सिंधुदुर्ग समाचार
ग्रामीण जनतेचे एकमेव लोकप्रिय मराठी दैनिक

**दैनिक सिंधुदुर्ग समाचार मधून आपल्या बातम्या, अडचणी थेट वाचकांपर्यंत पोहचविण्यात येतील आणि त्याला नावासहित प्रसिद्ध दिली जाईल. लेख, कथा, कविता sindhudurg.samachar@gmail. com या ईमेल वर पाठवू शकता. तसेच सिंधुदुर्ग समाचारचा अंक सुरू करण्यासाठी, व जाहीराती, बातम्यांसाठी संपर्क ९८२२९७९७३२.**
**kdrupa@gmail.com**

# विजय कुमार सिन्हा यांच्या ताफ्यावर हल्ला

## वैशालीतील लालगंज येथे ईव्हीएममध्ये बिघाड झाल्यानंतर गोंधळ






**लखीसराय (बिहार)**

बिहारमध्ये निवडणूक वातावरण तापले असतानाच गुरुवारी राज्याचे उपमुख्यमंत्री विजय कुमार सिन्हा यांनी खळबळजनक आरोप केला आहे. त्यांनी सांगितले की, त्यांच्या ताफ्यावर आरजेडीच्या (राष्ट्रीय जनता दल) समर्थकांनी हल्ला केला. हे समर्थक परिसरातील मतदारांना धमकावण्याचाही प्रयत्न करत असल्याचा त्यांचा दावा आहे.

विजय कुमार सिन्हा हे भाजपचे ज्येष्ठ नेते असून, लखीसराय मतदारसंघातून सलग चौथ्यांदा निवडणूक लढवत आहेत. त्यांनी सांगितले की, या घटनेबाबत स्थानिक प्रशासनाने योग्य प्रतिसाद दिला नाही, त्यामुळे ते हे प्रकरण निवडणूक आयोगाकडे नेणार आहेत.

या आरोपानंतर निवडणूक आयोगाने तत्काळ लक्ष घातले आहे. मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांनी राज्याचे पोलिस महासंचालक (डीजीपी) यांना तातडीने कारवाई करण्याचे निर्देश दिले आहेत. कोणालाही कायदा हातात घेण्याची परवानगी दिली जाणार नाही, गुन्हेगारांवर कठोर कारवाई होईल, असे निवडणूक आयोगाच्या अधिकाऱ्याने सांगितले.

लखीसरायचे पोलीस अधीक्षक अजय कुमार यांनी सांगितले की, ज्या भागात सिन्हा यांनी हल्ल्याचा आरोप केला, त्या ठिकाणी सध्या मतदान सुरू आहे. तुटलेल्या रस्त्यांमुळे काही निदर्शने झाल्याची माहिती आली आहे, पण प्रत्यक्षात काय घडले, हे मी घटनास्थळी भेट दिल्यावरच सांगू शकतो, असे त्यांनी सांगितले.

पत्रकारांशी बोलताना उपमुख्यमंत्री सिन्हा म्हणाले, सकाळपासूनच आरजेडीचे समर्थक मागासवर्गीय मतदारांना धमकावत आहेत. स्थानिक एसपी भित्रा आहे, तो म्हणतो सगळं शांत आहे. पण वस्तुस्थिती अशी आहे की लोकांना मतदान करू दिलं जात नाही. त्यांनी पुढे सांगितले, माझ्या ताफ्यातील एका गाडीवर विरोधकांच्या गुंडांनी दगडफेक केली. चप्पल, शेण फेकून वाहनांचे नुकसान केले. माझ्या कार्यकर्त्यांपैकी विभीषण केवट यांना मारहाण झाली असून त्यांना रुग्णालयात दाखल करण्यात आलं आहे. पण आजवर एकाही आरोपीला अटक झालेली नाही.

राजद पक्षावर थेट हल्ला करताना सिन्हा म्हणाले, हा पक्ष नेहमीच हिंसाचाराचा आधार घेत आला आहे. आज ते सत्तेबाहेर असताना ही अशी वागणूक देत आहेत, तर सत्तेत आले तर काय होईल, याचा अंदाज घ्या. मग बिहारमध्ये जंगलराजच परत येईल. स्थानिक प्रशासनाच्या भूमिकेबद्दल तीव्र नाराजी व्यक्त करत उपमुख्यमंत्र्यांनी सांगितले की, हे प्रकरण मी निवडणूक आयोगा समोर मांडणार आहे. काही अधिकाऱ्यांच्या संशयास्पद वर्तनाची चौकशी केली जाईल आणि आवश्यक ती कारवाई मागवली जाईल.

दरम्यान, आरजेडीने हे सर्व आरोप फेटाळले आहेत. पक्षाचे प्रवक्ते शक्ती यादव यांनी प्रत्युत्तर देताना म्हटलं, विजय सिन्हा खोटं बोलत आहेत. त्यांना Z+ सुरक्षा मिळते. राज्यात त्यांचाच पक्ष सत्तेत आहे आणि प्रशासनावर नियंत्रणही त्यांचं आहे. तरीही हे आरोप करून लोकांची दिशाभूल केली जाते आहे. प्रत्यक्षात स्थानिक

**पान ३ वर...**

# सावंतवाडीत वनविभागाच्या पथकासमोर ओंकार हत्तीला मारहाण

## हत्तीवर अत्याचार करणाऱ्यांवर कडक कारवाई करा

**बांदा । प्रतिनिधी**

ओंकार हत्तीला दांड्याने मारहाण करणाऱ्या संबंधित व्यक्तीच्या विरोधात कठोर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी निगुडे ग्रामपंचायतचे माजी उपसरपंच गुरुदास गवंडे यांनी सावंतवाडी उपवनसंरक्षक यांच्याकडे केली आहे. दोन दिवसांपूर्वी ओंकार हत्तीला बांदा-इन्सुली येथे फिरत असताना मारहाण झाली होती हा व्हिडिओ व्हायरल झाला होता. या पार्श्वभूमीवर श्री. गवंडे यांनी निवेदन दिले आहेत. या निवेदनात असे म्हटले आहे की,




ओंकार हत्ती गेल्या दोन महिन्यांपासून तालुक्यात विविध भागांत संचार करत आहे. परंतु त्याने आजवर कोणतीही जीवितहानी किंवा त्रास दिलेला नाही. शांत स्वभावाच्या या हत्तीवर मारहाण करणे ही अमानुष आणि वन्यजीव संरक्षण कायद्याच्या नियमांचे उल्लंघन करणारी घटना आहे. तसेच व्हिडिओत दिसणाऱ्या व्यक्तींवर वन्यजीव संरक्षण अधिनियम अंतर्गत गुन्हा दाखल करून कठोर कारवाई करण्यात यावी. त्याचबरोबर या घटनेच्या ठिकाणी उपस्थित असणारे वन कर्मचारी आणि पोलीस अधिकारी यांच्या भूमिकेचीही चौकशी करण्यात यावी व दोषींवरही कारवाई करावी. या

**पान ३ वर...**



**आज महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री श्री. अजितदादा पवार यांच्या हस्ते महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्सचे (MCCI) नवनिर्वाचित अध्यक्ष श्री. रविंद्र माणगावे यांचा अभिनंदनपर सत्कार करण्यात आला, तसेच यावेळी त्यांनी अध्यक्षांना कार्यकाळासाठी शुभेच्छा दिल्या. याप्रसंगी विश्वस्त मंडळाचे अध्यक्ष आशिष पेडणेकर, उपाध्यक्ष श्री. करुणाकर शेट्टी, राज्य मुख्य समन्वयक श्री वेदांशू पाटील, गव्हर्निंग कौन्सिल सदस्य श्री. ओम प्रकाश अग्रवाल, श्री. अण्णासाहेब पाटील आदी मान्यवर उपस्थित होते.**

### डॉ.श्रीनिवास रेड्डी खून प्रकरणात पाचवा आरोपी जेरबंद



**कणकवली । प्रतिनिधी**

बेंगळुर येथील डॉ. श्रीनिवास रेड्डी यांच्या खुनाच्या गुन्ह्यातील पाचवा आरोपी वर्धन के. एन. (वय २०, रा. अनुर, ता. चिंतामणी, जि. चिखबल्लापूर, कर्नाटक) याला एलसीबी सिंधुदुर्गच्या पथकाने कर्नाटक राज्यातून ताब्यात घेतले आहे. ही कारवाई ५ नोव्हेंबर रोजी एलसीबी पीएसआय अनिल हाडळ यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आली. या पथकात सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक सुरेश राठोड, अंमलदार अमर कांडर, चालक विक्रम पवार व मलकारसिद्द जमादार यांचा समावेश होता. ही कारवाई पोलीस अधीक्षक डॉ. मोहन दहिकर, अप्पर पोलीस अधीक्षक नयोमी साटम, व एलसीबी पोलीस निरीक्षक प्रवीण कोल्हे यांच्या मार्गदर्शनाखाली झाली.

६ नोव्हेंबर रोजी सकाळी ८ वाजता आरोपी वर्धन के. एन. याला घेऊन एलसीबीचे पथक कणकवली पोलीस ठाण्यात दाखल झाले व आरोपीला कणकवली पोलिसांच्या हवाली करण्यात आले. २३ ऑक्टोबर रोजी कणकवली तालुक्यातील साळीस्ते गणपती साना येथे अज्ञात पुरुषाचा धारदार शस्त्राने भोसकलेला मृतदेह आढळला होता. तपासानंतर तो मृतदेह बेंगळुर येथील डॉ. श्रीनिवास रेड्डी यांचा असल्याचे स्पष्ट झाले. दरम्यान या खुनाच्या प्रकरणात एलसीबीने पकडलेल्या आरोपींची संख्या आता पाचवर पोहोचली आहे, तर उर्वरित चार आरोपींचा शोध अद्याप सुरू आहे. २५ ऑक्टोबरपासून मागील पंधरवडाभर एलसीबीचे पथक बेंगळुर येथे ठाण मांडून तपास करत होते. अत्यंत हायप्रोफाईल असलेल्या या मर्डर मिस्ट्रीचा मोठा धागा उकलण्यात एलसीबी सिंधुदुर्गला यश मिळाले.

### दोडामार्ग सीमेवर एका कारने चार वाहनांना ठोकरले; एक गंभीर जखमी

**दोडामार्ग । वार्ताहर**

दोडामार्ग आणि गोवा सीमेवर एका कारने चार वाहनांना धडक दिल्याची भीषण घटना घडली आहे. या अपघातात एक जण गंभीर जखमी झाला असून दुसरा किरकोळ जखमी झाला आहे. अपघातात चारही वाहनांचे मोठे नुकसान झाले आहे.



गोवा व महाराष्ट्राच्या दोडामार्ग सीमेवर एक कारचालक रस्त्याच्या बाजूला उभा होता. त्याचवेळी एक दुचाकीस्वार गोव्यातून दोडामार्गकडे येत होता. दरम्यान, दोडामार्ग मधून गोव्याच्या दिशेने भरधाव वेगाने जाणारी एक कार सीमेवर आली. या कारने अचानक आपली दिशा बदलत विरुद्ध दिशेला धाव घेतली. यामुळे, प्रथम समोरील दुचाकीस्वाराला धडक दिली, त्यानंतर लगेच दुसऱ्या दुचाकीला ठोकरले. यानंतरही, कार थांबली नाही आणि पुन्हा विरुद्ध दिशेला जात रस्त्याच्या कडेला उभ्या असलेल्या कारला जोरदार धडक दिली. या अपघाताची तीव्रता इतकी मोठी होती की, धडकेचा मोठा आवाज झाला. आवाज ऐकून परिसरातील स्थानिक लोकांनी घटनास्थळी धाव घेतली आणि बघ्यांची मोठी गर्दी झाली.

**पान ३ वर...**

### मंगळसूत्र चोरीप्रकरणी शिर्डी येथील संशयितास न्यायालयीन कोठडी

**वेंगुर्ला । वार्ताहर**

वेंगुर्ला शहरातील विनायक रेसिडेन्सी येथील एका महिलेचे (सुमारे २५ ग्रॅम वजनाचे ) मंगळसूत्र १ नोव्हेंबर रोजी चोरीस गेले होते. दरम्यान वेंगुर्ला पोलिसांच्या पथकाने संबंधित संशयितास आज (दि. ६) सकाळी ८.१५ वाजता सातारा येथून ताब्यात घेतले. त्याला आज वेंगुर्ला न्यायालयासमोर हजर केले असता न्यायालल्याने त्यास न्यायालयीन कोठडी सुनावली आहे. संतोष वसंत माळकर (वय ४३, रा. शिर्डी) असे संबंधित संशयिताचे नाव आहे. विनायक रेसिडेन्सी येथील रहिवासी प्रतिमा प्रकाश जाधव यांनी वेंगुर्ला पोलिसांत मंगळसूत्र चोरीची फिर्याद दिली होती. त्यानुसार अज्ञाताविरोधात चोरीचा गुन्हा दाखल करण्यात आला होता.

त्यानुसार केवळ ४ दिवसांत वेंगुर्ला पोलीस निरीक्षक निसर्ग ओतारी यांच्या मार्गदर्शनाखाली पीएसआय योगेश राठोड, पोलीस हवालदार जयेश सरमळकर, वाहतूक पोलीस अंमलदार

**पान ३ वर...**

## रेल्वे कर्मचाऱ्यांच्या आंदोलनाचा मोठा फटका; लोकलनं चार प्रवाशांना उडवलं!

**मुंबई । प्रतिनिधी**

छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस रेल्वे स्थानकावर रेल्वे कर्मचाऱ्यांच्या आंदोलना मुळे काल गुरूवारी (६ नोव्हेंबर) रोजी मुंबईतील लोकल रेल्वे सेवा विस्कळीत झाली आहे. त्यामुळं लोकांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. अशातच लोकल सेवा विस्कळीत झाल्यामुळं काही प्रवासी रेल्वे रुळावरूनच चालत जात होते. यादम्यान, पाठीमागून आलेल्या लोकलनं चार प्रवाशांना उडवले. यात तीन जण गंभीर जखमी झाले आहेत. मध्य रेल्वेच्या मस्जिद बंदर-सँडहर्स्ट रोड रेल्वे स्थानकादरम्यान ही घटना घडली.

९ जून रोजी मुंब्रा येथे दोन लोकल ट्रेनचा अपघात झाला होता. त्यावेळी पाच जणांचा मृत्यू झाला होता. या अपघाताच्या तपासाचा अहवाल आता लोहमार्ग पोलिसांनी सादर केला आहे. या अहवालात घटनेच्या चार दिवस आधी, रेल्वे कर्मचाऱ्यांनी ट्रॅकचा एक तुकडा बदलला परंतु तो वेल्डिंग न करता सोडला, ज्यामुळं हा अपघात झाल्याचं म्हटलं आहे. म्हणजेच रेल्वे कर्मचाऱ्यांच्या निष्काळजीपणामुळं हा अपघात झाल्याचा ठपका लोहमार्ग पोलिसांनी ठेवला आहे. सोबतच अपघाताला कारणीभूत मध्य रेल्वेच्या दोन अभियंत्यांविरोधात देखील गुन्हा दाखल केला आहे. त्यामुळं लोहमार्ग पोलिसांच्या या कारवाई विरोधात रेल्वे कर्मचारी संघटना आक्रमक झाल्या आहेत.




गुरूवारी सायंकाळी चार वाजल्यापासून मध्य रेल्वेच्या मुख्यालयाबाहेर कर्मचारी संघटनांचे आंदोलन सुरू असून, याचा उपनगरीय वाहतुकीवर परिणाम झाल्याचं पाहायला मिळत आहेत. तसंच लोहमार्ग पोलिसांच्या कारवाई विरोधात नॅशनल रेल्वे मजदूर युनियनकडून आज संध्याकाळी मोर्चा देखील काढण्यात आला. युनियनचे सर्व मोर्चे करी मुख्य इमारतीजवळ आले आणि त्यांनी लोको पायलट मोटरमन विभागासमोर ठिय्या मांडला. महत्त्वाची बाब म्हणजे मोटरमन देखील यात सहभागी झाले असल्यामुळं याचा परिणाम हार्बर आणि मुख्य मार्गावरील वाहतुकीवर झाला. अशातच गर्दीच्या वेळी या कर्मचाऱ्यांनी ठिय्या मांडल्यानं मध्य आणि हार्बर मार्गावरील लोकल छत्रपती

**पान ३ वर...**

॥ बुडती हे जण न देखवे डोळा! ॥

# व्होट जिहादचा खेळाचे – लोकशाहीला गंडवणाऱ्या प्रचाराचं सत्य ?

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका जाहीर झाल्या आणि लगेच नेहमीचा प्रयोग सुरू झाला – एकच मुद्दा, दुबार मतदार, व्होट जिहाद, डेमोग्राफिक बदल. पत्रकार परिषद घेऊन भाजप नेते आशिष शेलार आणि अमित साटम यांनी ही संपूर्ण कथा मांडली आणि माध्यमांनी ती पुन्हा पुन्हा दाखवली. पण प्रश्न असा आहे की, या गोष्टी खरंच लोकशाही वाचवण्यासाठी केल्या जातात की निवडणुकीचं वातावरण तापवण्यासाठी?

शेलार यांनी पत्रकार परिषदेत मोठमोठ्या आकड्यांची उधळण केली – १६ लाखांहून अधिक मुस्लीम आणि ख्रिश्चन दुबार मतदार, निवडणूक प्रक्रियेचा गैरवापर, व्होट जिहाद असे म्हणत त्यांनी महाराष्ट्रात संशयाचं सावट निर्माण केलं. पण या आरोपांमागे एकही अधिकृत आकडा नाही, निवडणूक आयोगाची एकही पुष्टी नाही आणि कोणत्याही तपास यंत्रणेचा ठोस अहवाल नाही. म्हणजेच ही आकड्यांची सगळी मांडणी फक्त राजकीय भासवणूक आहे. जणू काही सत्य नव्हे, तर वृत्ती विकण्याचं काम चाललं आहे.

भारतासारख्या प्रचंड लोकसंख्येच्या देशात मतदारयादी तयार करणे ही प्रचंड मोठी आणि क्लिष्ट प्रक्रिया आहे. लोकं स्थलांतर करतात, नावे बदलतात, मृत्यू नोंदी उशिरा होतात, त्यामुळे काही ठिकाणी नावं दुप्पट राहतात, ही गोष्ट निवडणूक आयोग स्वतः मान्य करतो. पण तीच बाब धार्मिक कटकारस्थान बनवणं हा निव्वळ राजकीय खेळ आहे. जर खरोखरच इतकी मोठी गडबड झाली असती, तर निवडणूक आयोगाने तत्काळ चौकशी केली असती. पण तसं काही झालं नाही. उलट आयोगाने आधीच सांगितलंय की, मतदारयादी अद्ययावत करण्याची प्रक्रिया चालू आहे.

मग एवढं असूनही जिहादचा रंग का दिला जातो? कारण भीती विकणं हे राजकारणातलं जुन शस्त्र आहे. व्होट जिहाद म्हटल्यावर दोन गोष्टी साध्य होतात – एक म्हणजे समाजात विभागणी आणि दुसरं म्हणजे भाजप स्वतःला बहुसंख्यांचा रक्षक म्हणून उभं करतं. बाकी वास्तवाचं काही देणंघेणं नाही.

शेलार यांनी काही मतदार संघांचे आकडे सांगितले – साकोली, कर्जत–जामखेड, वांद्रे, मुंब्रा, लातूर इत्यादी. पण हे आकडे कोणत्या अधिकृत यादीवरून घेतले, हे त्यांनी सांगितलेच नाही. निवडणूक आयोगाच्या वेबसाइटवर धर्माधारित विभाजन उपलब्ध नाही. म्हणजेच हे आकडे कोणत्या निकषावर मुस्लीम दुबार मतदार ठरवले गेले, हा मोठाच प्रश्न आहे. एखाद्याचं नाव अहमद किंवा फातिमा असलं की तो मुस्लीम, असं ठरवून केलेली गणना ही सरळसरळ समाजविभाजन आहे. अशा गोष्टींचा परिणाम भयंकर असतो कारण त्या जनतेत संशय निर्माण करतात. लोकांना वाटतं की, आपल्या शेजारचा मुस्लीम माणूस बहुतेक दोन ठिकाणी मतदान करतोय. ही धारणा जेव्हा पसरते, तेव्हा लोकशाहीपेक्षा धार्मिक ओळख मोठी ठरते आणि हीच खरी धोक्याची घंटा आहे.

भाजपचे किरीट सोमय्या यांनाही व्होट जिहादचा शोध लागला होता. त्यांनी निधी, एनजीओ, ट्रस्ट या सगळ्यांबद्दल गोष्टी सांगितल्या. पण आजवर त्या दाव्याचा एकही ठोस पुरावा न्यायालयात, संसदेत किंवा आयोगाकडे दाखवला गेला नाही. म्हणजे मुद्दा असा की आरोप नेहमी मोठे असतात, पण पुरावे मात्र गायब. हे नेहमी निवडणुकीच्या आधीच का घडतं? कारण मुद्दा हा निवडणूकपूर्व विचारांपासून लक्ष वळवणं आहे. बेरोजगारी, महागाई, शेतकरी संकट, आरोग्यव्यवस्था या प्रश्नांवर उत्तर नाही, म्हणून व्होट जिहादची भिंत उभी केली जाते. हीच युक्ती आधी लव्ह जिहाद, लँड जिहाद, पॉप्युलेशन जिहाद यासाठी वापरली गेली होती. आता त्या मालिकेत नवा भाग – व्होट जिहाद! आणि या सगळ्याचा शेवट काय? समाजात आणखी भिंती, आणखी अविश्वास, आणि सत्ताधाऱ्यांचं राजकारण अधिक सुरक्षित.

निवडणूक आयोग ही स्वतंत्र संस्था आहे. जर खरोखरच मतदारयादीत इतक्या मोठ्या अनियमितता असतील, तर ती चौकशी आयोगानेच करायला हवी. पण भाजप नेते स्वतःच तपासक, न्यायाधीश आणि निर्णायक बनतात. त्यांना निवडणूक आयोगावर विश्वास नाही का? आयोगाने निवडणुकीत पारदर्शकता वाढवण्यासाठी ईव्हीएम, व्हीव्हीपॅट, डेमोग्राफिक तपासणी अशी अनेक पावलं उचलली आहेत. तरीही भाजप नेते वारंवार मतचोरी, सिस्टम हॅक अशी भीती पसरवतात. हे लोकशाहीवर थेट अविश्वास टाकणारं आहे. जर आरोप खरे असतील, तर न्यायालयात जा, पुरावे द्या, तपास मागा. पण तसे न करता फक्त मीडियाच्या कॅमेऱ्या समोर आरोप करायचे आणि समाजात संशयाचं विष पसरवायचं – हा लोकशाहीला कमकुवत करणारा प्रकार आहे.

जेव्हा एखादा नेता म्हणतो की मुस्लीम दुबार मतदार आहेत, तेव्हा तो फक्त एक आरोप करत नाही, तर एक संपूर्ण समाज संशयाच्या चौकटीत ढकलतो. सगळ्या समाजाला एकाच रंगात रंगवतो. ज्यांनी या देशाच्या लोकशाहीत सतत मतदान केलं, कर भरला, काम केलं – त्यांनाच संशयित बनवलं जातं. हे म्हणजे देशभक्तीच्या नावाखाली विभाजनाचं राजकारण. याचं राजकीय गणित स्पष्ट आहे – बहुसंख्य समाजात भीती आणि संशय पसरवायचा आणि मग स्वतः ला रक्षक म्हणून मांडायचं. पण या खेळात देशाचं नुकसान होतं कारण लोकशाहीचा पाया विश्वासावर टिकतो. मतदान हा अधिकार असला, तरी तो सर्व नागरिकांचा समान अधिकार आहे – धर्म, जाती, पंथ, प्रदेश यांच्या भेदाशिवाय.

सगळं व्होट जिहादवर केंद्रित झालंय, पण मतदार यादीतील गोंधळाचे मूळ प्रश्न हाताळले गेलेच नाहीत. मतदार केंद्र बदलताना नोंदणी नीट होते का, स्थलांतरित कामगारांची नावे अद्ययावत होतात का, मृत व्यक्तींची नावे काढली जातात का, आयटी प्रणाली पारदर्शक आहे का – या प्रश्नांवर सरकारने ठोस उपाययोजना केल्या का? नाही. कारण त्यात राजकीय फायदा नाही. त्याऐवजी कोण दुबार मतदार? या भावनिक प्रश्नावर समाजाला भिडवणं सोपं.

पंतप्रधान मोदी यांनी डेमोग्राफिक बदलचा मुद्दा उचलला आणि तो लगेच राष्ट्रीय सुरक्षाशी जोडला गेला. पण याचा अर्थ काय? जर एखाद्या शहरात मुस्लीम लोकसंख्या वाढली, तर ती लोकसंख्या मतदान करून लोकशाही प्रक्रियेत सहभागी होत असेल, तर त्यात गुन्हा कुठे? लोकसंख्या वाढणं हे सामाजिक, आर्थिक, स्थलांतराशी संबंधित असतं – धर्माशी नाही. त्याला धोका म्हणणं म्हणजे लोकसंख्या शास्त्राचं राजकारण करणं. अशा प्रकारे धर्म आणि राष्ट्रीय सुरक्षेला एकत्र आणून भीतीचं वातावरण तयार करणं ही अतिशय धोकादायक प्रवृत्ती आहे. याने शासनातील अपयश झाकलं जातं आणि लोकांच्या भावना भडकवल्या जातात.

लोकशाही ही मतदानावर नाही, तर प्रामाणिक मत दानावर टिकते – हे खरं. पण प्रामाणिकता फक्त मतदारां नीच नाही, तर राजकारण्यांनीही दाखवायला हवी. जर प्रत्येक निवडणुकीपूर्वी तुम्हीच लोकशाही संस्थांवर अविश्वास दाखवणार असाल, तर मग देशात विश्वास उरणार कुठे? भाजप नेत्यांना खरोखरच लोकशाहीची चिंता असेल, तर त्यांनी निवडणूक आयोगाशी पारदर्शक सहकार्य करावं आणि सर्व मतदारांचे हक्क अबाधित राहतील यासाठी प्रयत्न करावेत. पण फक्त एक धर्म मतदानात गोंधळ करतो असा प्रचार करायचा असेल, तर मग ते लोकशाही नव्हे – ते मतांचं ध्रुवीकरण आहे.

आज मतदारयादीवरील चर्चा लोकशाहीच्या शुद्धतेबद्दल नसून, धार्मिक नजरेतून बघण्याकडे वळली आहे. हा देश लोकशाहीने टिकला आहे कारण येथे मतदाराने धर्म पाहिला नाही, तर उमेदवाराचं काम पाहिलं. त्या संस्कृतीवरच आघात केला जातोय. भाजपला खरोखरच दुबार मतदारांची चिंता असेल, तर त्यांनी सर्व समाजातील अशा नोंदी उघड कराव्यात – फक्त एका धर्माच्या नव्हे. पण तसं ते कधीच करत नाहीत, कारण हेतू सुधारणा नाही, हेतू भावनिक फायद्याचा आहे.

आज खरी जबाबदारी जनतेची आहे. कारण राजकारणी कोणताही मुद्दा आपल्या सोयीने रंगवतो. मतदारयादीतील गोंधळ दूर करणं हा सर्वांचा प्रश्न आहे – हिंदू, मुस्लीम, ख्रिश्चन, दलित, मराठी, हिंदी सगळ्यांचा. त्याला जिहादचं लेबल लावणं म्हणजे आपल्या समाजाला संशयाच्या जाळ्यात ढकलणं. मतदान हा धर्माचा प्रश्न नाही, तो नागरिकत्वाचा प्रश्न आहे. ज्यांना व्होट जिहाद दिसतो, त्यांनी एकदा आरसा बघावा – त्यांचा प्रचारच लोकशाहीविरुद्ध भय जिहाद बनलाय का?

दुबार मतदारांचा प्रश्न वास्तविक आहे, पण त्यावर उपाय निवडणूक आयोगाकडे आहेत. त्याला व्होट जिहादचा रंग देणं हे राजकीय हेतूचं प्रदर्शन आहे. लोकशाही टिकवायची असेल, तर धर्माच्या नावाने अविश्वास नाही, तर प्रणालीवर विश्वास आणि पारदर्शकता वाढवणं गरजेचं आहे. कारण भीती पेरून सत्ता मिळवणं सोपं असतं – पण विश्वास पेरून लोकशाही वाचवणं, हेच खरं राष्ट्रकार्य आहे

## जनसंवाद

### महान देश भारत

पहेलगाम येथील हिंदूंवरील आक्रमणाचा संदर्भ थेट भारतातील रोहिंग्या घुसखोरीवर दबाव वाढवण्याशी जोडणारा एकदम खोटा,हिंदुद्वेषी,भारतद्वेषी आणि निषेधार्ह अहवाल म्यानमार येथील संयुक्त राष्ट्रांचे मानवाधिकार्यांच्या संदर्भातील विशेष दूत थॉमस अँड्युज यांनी मांडला आहे. त्यांच्या या अहवालात पहलगाम आतंकवादी आक्रमणाचा परिणाम भारतातील रोहिंग्या च्या स्थलांतरितांच्या स्थितीवर झाला आहे. निर्वासितांवर दबाव वाढला आहे. त्यांना फसवून म्यानमार, बांगलादेशात पाठवण्यात आले आहे अशी धूळफेक करणारी माहिती दिली आहे. हिंदू बहुल देशात हिंदूंच्या मानवाधिकार्यांचे हनन होत असताना संयुक्त राष्ट्रांनी याची कधी नोंद घेतली नाही, कधीही निषेध केला नाही. लव जिहाद मध्ये फसविलेल्या आणि जीवन उध्वस्त झालेल्या हिंदू महिला, मुली यांच्या विषयी कधीही करूणेचे दोन शब्द उच्चारले नाही. पाक सारख्या आतंकवादी देश संयुक्त राष्ट्रांच्या व्यासपीठाचा उपयोग करून भारताचा अविभाज्य भाग असलेल्या काश्मीर विषयी राग सातत्याने आळवत आहे.

अमेरिका, चीन, पाकिस्तान,बांगलादेशात हिंदूंवर अत्याचार, हल्ले होत आहे त्यावर संयुक्त राष्ट्राच्या परिषदेने काहीच केले नाही/ करत नाही. भारतासारख्या जागतिक क्षितिजावर आत्म निर्भरतेने पुढे येणाऱ्या, अनेक क्षेत्रांमध्ये झळकणाऱ्या देशाला संयुक्त राष्ट्रांच्या सुरक्षा परिषदेचे कायमस्वरूपी सदस्यत्व दिले जात नाही ही खेदाची गोष्ट आहे. जागतिक पातळीवर स्वतःचे स्थान निर्माण करत इतर गरजू देशांना सहाय्य करणाऱ्या देशातील अंतर्गत गोष्टींमध्ये नाक खूपसण्याची सवय संयुक्त राष्ट्रांनी सोडून दिली पाहिजे. भारताकडून जगाने विशेषता संयुक्त राष्ट्रांनी मानवता, उदारता, नि:स्पृहता, सहिष्णुता,क्षमाशीलता आणि मानव जातीचे कल्याण करण्याची वृत्ती शिकणे आवश्यक आहे. भारताविरुद्ध वांझोटे, अभ्यासहीन अहवाल सिद्ध करणाऱ्यांनाच भारतीय जीवन आणि उपासना पद्धत शिकण्यासाठी देशात येण्याची गरज आहे. जागतिक पातळीवर पूर्वग्रह दूषित वृत्तवाहिन्यांच्या साम्यवादी विचारसरणीच्या पत्रकारांचे वृत्तांकन वाचून मत बनवणे हा आत्मघात होईल. त्यासाठी भारतीयता आत्मसात करणे आवश्यक आहे.

**लीना मकरंद गाडगीळ पनवेल**

### डिजिटल अरेस्ट' एक धोका आणि त्यावरील उपाय

'डिजिटल अरेस्ट' हा सायबर गुन्ह्याचा एक प्रकार आहे. यामध्ये 'सीबीआय', 'अंमलबजावणी संचालनालय' आदी उच्चपदस्थ पोलीस अधिकारी असल्याचं खोटं सांगून, अमली पदार्थ, काळा पैसा यांमध्ये संबंधित व्यक्ती गुंतली असल्याची भीती दाखवून पैसे उकळले जातात. यासाठी वारंवार 'व्हॉट्सप' किंवा 'व्हिडिओ' कॉल करून त्यांना सतत एका जागी खिळवून ठेवले जाते. यामध्ये वृद्धांना लक्ष्य करण्याच्या घटना मोठ्या प्रमाणात वाढल्या आहेत.जर कोणी तुम्हाला फोनवर तात्काळ अटक करण्याची धमकी देत असेल आणि ती टाळण्यासाठी पैसे मागत असेल, तर ते १००% फसवणूक करणारे आहेत. कोणतीही माहिती शेअर करू नका. ओळख उघड करू नका: तुमच्या बँक खात्याची माहिती, एटीएम पिन, ओटीपी (OTP), आधार कार्ड किंवा पॅन कार्ड तपशील कोणालाही देऊ नका. पोलिस किंवा बँक अधिकारी फोनवर ही माहिती मागत नाहीत.व्हिडिओ कॉलवर सहकार्य करू नका: फसवणूक करणारे तुम्हाला व्हिडिओ कॉलवर बराच वेळ 'ऑन' राहण्यास सांगतात, ज्यामुळे तुम्ही पूर्णपणे त्यांच्या नियंत्रणात राहता. अशा कॉलला तत्काळ डिस्कनेक्ट करा. याव्यतिरिक्त मुंबई पोलिसांनी गुन्हे अन्वेषण शाखेद्वारे वृद्धामध्ये जागृती करण्यात येत आहे. आपण सर्वांनी सतर्क राहूया आणि धोक्यापासून सावध राहूया.

**श्री आल्हाद माळगांवकर पनवेल**

# अॅड.असीम सरोदे यांचे सनद निलंबन म्हणजे अभिव्यक्ती स्वातंत्र्यावर थेट हल्ला - एआयएलयू

ऑल इंडिया लॉयर्स युनियन (एआयएलयू) ख्यातनाम मानवाधिकार वकील अॅड. असीम सरोदे यांची सनद बार कौन्सिल ऑफ महाराष्ट्र अँड गोवा (BCMG) यांनी निलंबित केल्याच्या निर्णयाचा तीव्र निषेध करते. आरएसएस प्रणित भाजप सत्तेवर आल्यापासून आपल्या विरोधी सर्वच आवाजाची गळचेपी चालू आहे. राजकीय विरोधक, सामाजिक कार्यकर्ते, विचारवंत, लेखक, मानवाधिकार कार्यकर्ते, पत्रकार आणि वकील आदी लोकं सरकार लक्ष्य करत आहे. एआयएलयू या गोष्टीचा जाहीर निषेध करते आणि त्यांच्यावरील ही कारवाई रद्द करण्याची मागणी करते.

हा तीन महिन्यांचा निलंबनाचा आदेश केवळ मार्च २०२४ मध्ये झालेल्या एका सार्वजनिक कार्यक्रमात अॅड. सरोदे यांनी केलेल्या टिप्पण्यांवर आधारित आहे, जिथे त्यांनी न्याय व्यवस्थेच्या कार्यपद्धती आणि संवैधानिक पदाधिकाऱ्यांच्या जबाबदारीवर भाष्य केले होते. भाजपाचे महाराष्ट्राचे माजी राज्यपाल यांच्यावर टीका केली तसेच भाजपाचे विधानसभा अध्यक्ष यांच्या निकालावर नापसंती व्यक्त केली या कथित कारणासाठी वकिलांच्या महाराष्ट्र आणि गोवा बार असोसिएशनच्या शिस्तभंग विषयक समितीने तीन महिन्याच्या निलंबनाची कारवाई केली आहे. त्या कार्यक्रमात अॅड. सरोदे यांनी न्याय वितरण यंत्रणेतील प्रणालीगत विलंब, सामान्यनागरिकांनान्यायालयातप्रवेशमिळवण्यातील अडचणी आणि संवैधानिक पदाधिकाऱ्यांच्या अधिक जबाबदारीची गरज यावर बोलले होते. माध्यमांच्या अहवालानुसार त्यांनी काही संवैधानिक पदे - यात राज्यपालांचाही समावेश आहे - आपली कर्तव्ये पार पाडण्याच्या पद्धतीवर प्रश्न उपस्थित केले लोकशाहीत सर्व संवैधानिक पदाधिकारी जनतेप्रति जबाबदार राहिले पाहिजेत या आशयाचे विधान केले होते. त्यांची ही टिप्पणी रचनात्मक आणि लोकशाही भावनेने केलेली होती, ज्यात संवैधानिक चौकटीतील संस्थांनी पारदर्शक आणि जबाबदारीने कार्य करावे अशी अपेक्षा व्यक्त केली होती. शासन पुरस्कृत दिरंगाईत प्रणालीतील त्रुटी उजागर करणे कोणत्याही व्यक्तीची बदनामी करणे किंवा न्यायव्यवस्थेचा अपमान करणे नसते.

त्यांनी जर एखाद्या पक्षाच्या अंतर्गत कार्यक्रमांमध्ये काही टिपणी केली असेल तर तो त्यांचा लोकशाही अधिकार आहे. त्यामुळे त्यांनी कोणत्याही पदाचा अनादर केलेला नाही. स्वतः भाजपाचे माजी राज्यपाल आणि विधानसभा अध्यक्ष यांनी सुद्धा त्याबद्दल कोणतीही वैयक्तिक तक्रार केलेली नाही. असे असताना एखाद्या त्रयस्थ आणि भाजपा कार्यकर्त्यांच्या अर्जावर वकील बार कौन्सिलच्या शिस्तभंग विषयक समितीने निलंबनासारखी कठोर शिक्षा देणे अत्यंत अयोग्य, चुकीचे आणि दडपशाही करणारे आहे. अॅड. सरोदे यांनी कोणताही शिस्तभंग किंवा वकील म्हणून कोणतेही अनैतिक वर्तन केलेले नाही परंतु त्याचा कोणताही विचार बार कौन्सिलने केल्याचे दिसत नाही. बार कौन्सिल सारख्या नियामक मंडळाने पक्षिय राजकारण्यापासून स्वतःला अलग ठेवत आपले निर्णय कायद्याच्या चौकटीनुसार घेणे अपेक्षित असते. भाजपच्या अथवा कुठल्याही राजकीय भूमिकांसाठी बार कौन्सिलचा गैरवापर होऊ न देणे ही बार कौन्सिलची जबाबदारी आहे प्रसिद्ध पर्यावरणवादी कार्यकर्ते सोनम वांगचूक यांच्यावर नुकतीच देशद्रोहासारख्या कलमाखाली दडपशाही करणारी कारवाई भाजपा सरकारने केलेली आहे. अशाच प्रकारे देशामध्ये पत्रकार, लेखक, सामाजिक कार्यकर्ते, वकील यांच्यावर कारवाई आणि दडपशाही सुरू आहे. संविधानाने दिलेले जनतेचे अभिव्यक्ती स्वातंत्र्य अबाधित राखणे ही सर्व कायदेशीर संस्थांची महत्त्वाची जबाबदारी आहे. या कार्यक्रमानंतर भाजप व आरएसएस संबंधित व्यक्तींनी महाराष्ट्र आणि गोवा बार असोसिएशनच्या (BCMG) कडे तक्रार दाखल केली.

त्या तक्रारीवर कारवाई करत बार कौन्सिलने १२ ऑगस्ट २०२५ रोजी अॅड. सरोदे यांचा परवाना तीन महिन्यांसाठी निलंबित करण्याचा आदेश पारित केला. मात्र हा आदेश त्यांना ३ नोव्हेंबर २०२५ रोजी म्हणजे जवळपास तीन महिन्यांनंतर कळवला गेला. आदेश कळवण्यातील विलंब आणि आदेशाचे कारण स्पष्ट न करणे यामुळे प्रक्रियात्मक न्याय आणि नैसर्गिक न्यायाच्या तत्त्वांचे पालन याबाबत गंभीर शंका निर्माण झाल्या आहेत. कायदा व्यवसायातील सदस्यांनी चिंता व्यक्त केली आहे की अनुशासनात्मक प्रक्रिया बाह्य दबाव किंवा राजकीय विचारांमुळे प्रभावित झाल्याचे दिसते, कारण लोकशाही मत व्यक्त केल्याबद्दल दंडात्मक कारवाई ही ना न्याय्य आहे, ना संविधानात हमी असलेल्या अभिव्यक्ती स्वातंत्र्याशी सुसंगत आहे.

निरोगी लोकशाही टिकवण्यासाठी वकील म्हणून न्याय व्यवस्था, सरकारी कृत्ये किंवा संवैधानिक पदाधिकाऱ्यांवर टीका करणे हे वकीलाचे हक्क




आणि कर्तव्य आहेत, प्रश्न उपस्थित करणे आणि सुधारणा मागणे हे लोकशाही अधिकार असून नाही; अशा आवाजांना दडपणे हे दुष्कृत्य आहे. अनुशासनात्मक कार्यवाहीचा वापर करून वकीलांना गप्प करणे हे कायदा व्यवस्थेलाच अन्याय करणे आहे.

एआयएलयू मागणी करते की बार कौन्सिल ऑफ महाराष्ट्र अँड गोवा यांनी त्वरित निलंबन मागे घ्यावे आणि बार कौन्सिल ऑफ इंडिया (BCI) यांनी हस्तक्षेप करून अनुशासनात्मक यंत्रणा स्वतंत्र, पारदर्शक आणि राजकीय हस्तक्षेपाशिवाय कार्यरत राहील याची खात्री करावी. संवैधानिक मत व्यक्त केल्याबद्दल वकीलाला लक्ष्य करणे हे धोकादायक आहे व लोकशाही स्वातंत्र्यांच्या मूलभूत पायावरच आघात असल्याने कदापि सहन केले जाणार नाही. ड. असिम सरोदे यांना त्यांची सनद तत्काळ बहाल करण्यात यावी. एआयएलयू अॅड. असीम सरोदे यांच्यासोबत पूर्ण एकजूटीने उभी आहे.

**अॅड. बाबासाहेब वावळकर**
**(अध्यक्ष, एआयएलयू, महाराष्ट्र)**
**अॅड. चंद्रकांत बोजगर**
**(सचिव, एआयएलयू, महाराष्ट्र)**

# गरीब वीजग्राहकांना २५ वर्षे मोफत वीज राज्य शासनाच्या स्मार्ट योजनेसाठी महावितरणचा पुढाकार

दारिद्र्य रेषेखालील आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांच्या घरांवर एक किलोवॅट क्षमतेचा सौर ऊर्जा निर्मिती प्रकल्प बसवून त्यांना २५ वर्षे मोफत विजेची सुविधा उपलब्ध करण्यासाठीच्या स्वयंपूर्ण महाराष्ट्र आवासीय रूफ टॉप (स्मार्ट) योजनेच्या अंमलबजावणीसाठी महावितरणने पुढाकार घेतला आहे. केंद्र सरकार व राज्य सरकारच्या अनुदाना मुळे या योजनेतील लाभार्थी ग्राहकांना खूप कमी हिस्सा भरावा लागणार आहे, असे महावितरणचे अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक मा. लोकेश चंद्र यांनी सांगितले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वात राज्य सरकारने स्मार्ट योजना सुरू केली आहे. दारिद्र्य रेषेखालील १.५४ लाख तर आर्थिकदृष्ट्या दुर्बल ३.४५ लाख अशा महिना १०० युनिटपेक्षा कमी वीज वापणाऱ्या पाच लाख घरगुती वीज ग्राहकांना मोफत वीज मिळावी आणि अतिरिक्त वीज विकून उत्पन्नही मिळावे यासाठी ६५५ कोटी रुपयांची तरतूद केली आहे. ही योजना प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य तत्वावर राबविण्यात येणार आहे. महावितरणच्या नुकत्याच झालेल्या संचालक व मुख्य अभियंत्याच्या राज्यस्तरीय बैठकीत या योजनेच्या अंमल बजावणीबाबत सूचना देण्यात आल्या. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात केंद्र सरकारने प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजना सुरू केली आहे. त्यामध्ये ग्राहकांना एक किलोवॅटचा छतावरील सौर ऊर्जा प्रकल्प बसविण्यासाठी ३० हजार रुपये अनुदान केंद्र सरकारकडून मिळते. स्मार्ट योजनेत या अनुदानाखेरीज राज्य सरकारकडूनही अनुदान मिळणार असल्याने वीज ग्राहकांना खूप कमी हिस्सा भरून प्रकल्प बसविता येईल. स्मार्ट योजनेनुसार दारिद्र्यरेषेखालील ग्राहकांना एक किलोवॅटचा सौर ऊर्जानिर्मिती प्रकल्प बसविण्यासाठी केंद्र सरकारकडून ३० हजार रुपये तर राज्य सरकारकडून १७,५०० रुपये अनुदान मिळेल. सौर ऊर्जा प्रकल्पाची ऊर्वरित रक्कम भरून ग्राहक २५ वर्षे मोफत विजेचा लाभ घेऊ शकतो. शंभर युनिटपेक्षा कमी वीज वापर असणाऱ्या आर्थिकदृष्ट्या दुर्बल ग्राहकांनाही केंद्र सरकारच्या ३० हजार रुपये अनुदानाखेरीज राज्य सरकारकडून अनुदान मिळणार आहे. या गटातील सर्वसाधारण ग्राहकांना दहा हजार रुपये राज्य सरकारकडून मिळतील. अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीच्या ग्राहकांना राज्य सरकार १५ हजार रुपये अनुदान देणार आहे. एक किलोवॅटच्या सौर ऊर्जा निर्मिती प्रकल्पातून दरमहा सुमारे १२० युनिट वीजनिर्मिती होते. त्यामुळे शंभर युनिटपर्यंत वीज वापरणाऱ्या ग्राहकांना स्वतःची गरज भागवून अतिरिक्त वीज महावितरणला विकता येते. या प्रकल्पातून २५ वर्षे वीजनिर्मिती होत असल्याने तेवढा काळ लाभ होतो. या योजनेमुळे ग्रामीण आणि शहरी भागातील ऊर्जे तील विषमता कमी होणार आहे. ग्रामीण भागात अजूनही वीजपुरवठ्यात खंड पडतो किंवा लोडशेडिंगमुळे त्रास होतो. अशा ठिकाणी सौरऊर्जेवर आधारित प्रकल्प बसवल्या मुळे घराघरात स्थिर वीजपुरवठा मिळणार आहे. यामुळे विद्यार्थ्यांना अभ्यासासाठी अंधाराशी झगडावं लागणार नाही, छोट्या उद्योगधंद्यांना अखंड वीज उपलब्ध होईल आणि महिलांच्या घरगुती कामातही सोय होईल. हळूहळू हे गाव वीजबचतीच्या आणि ऊर्जा स्वावलंबनाच्या दिशेने वाटचाल करतील.याशिवाय या उपक्रमा मुळे पर्यावरणीय फायदाही मोठ्या प्रमाणावर होणार आहे. सौरऊर्जेमुळे कोळसा आणि इंधनावरचा ताण कमी होईल, कार्बन उत्सर्जन घटेल आणि हरित महाराष्ट्राचे स्वप्न अधिक वास्तवात येईल.

हे वृत्तपत्र मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक रूपाली रवीन डांगे (अॅड.रूपाली मुकुंद कदम) (बी.एस.एल, एल.एल.बी, एमसीए) ४३७११/८५ यांनी मे.विक्रम मुद्रणालय, १०३ मेन रोड, कणकवली, जिल्हा सिंधुदुर्ग ४१६६०२ येथे छापून १०३ मेन रोड, कणकवली, जिल्हा सिंधुदुर्ग येथून प्रसिद्ध केले. मुख्य कार्यालय : दैनिक सिंधुदुर्ग समाचार, नरडवे चौक समोर, कणकवली जि.सिंधुदुर्ग वृत्तपत्रात छापलेल्या बातम्या, लेख, छायाचित्रे व जाहिराती यांच्याशी संपादक सहमत असेल असे नाही.
मालक, प्रकाशक आणि संपादक रूपाली रवीन डांगे (अॅड.रूपाली मुकुंद कदम) – ९८२२९७९७३२, कार्यालय संपर्क क्रमांक : ९८२२९७९७३२ ( पी.आर.बी. कायद्याअंतर्गत बातम्याच्या निवडीसाठी जबाबदार.) संस्थापक कै.मुकुंद हरी कदम (एम.ए,एल.एल.बी)
This 'Daily Sindhudurg Samachar', Owner, Publisher by Rupali Ravin Dange (Adv.Rupali Mukund Kadam) BSL, LLB printed at Ms.Vikram Mudranalay, 103 Main Road, kankavli, Dist - Sindhudurg 416602, Published from 103 Main Road, kankavli, Dist - Sindhudurg 416602. The editor does not necessarily agree with the news, articles, photographs and advertisements printed in the newspaper.
Owner, Publisher, Printer, Editor Rupali Ravin Dange (Adv.Rupali Mukund Kadam) Contact No. - 9822979732, Office Contact No. - 9822979732 (Responsible for selection of news under PRB ct.)
Email: sindhudurg.samachar@gmail.com Website: www.sindhudurgsamachar.in Facebook: sindhudurgsamacharlive, samacharhub Instagram: sindhudurgsamachar youtube: sindhudurgsamachar

# भुदरगड पतसंस्थेच्या ठेवीदारांची अडचण कायम - ठेवी मिळणे झाले कठीण स्वप्न!

## सिंधुदुर्गातील ठेवीदारांचे तब्बल पंधरा ते वीस कोटी अडकले

**कुडाळ । मनोज देसाई**

पतसंस्था व्यवसायातील काळा अध्याय म्हणून ओळखल्या जाणाऱ्या भुदरगड नागरी सहकारी पतसंस्थेच्या गैरव्यवहारामुळे ठेवीदारांची मोठी फसवणूक झाल्याचे चित्र आजही कायम आहे. संचालकांच्या मनमानी कारभारामुळे आणि अव्यावहारी निर्णयांमुळे या पतसंस्थेवर बुडीत संस्था असा शिक्का बसला. नव्वदच्या दशकात गाजलेल्या या प्रकरणाचा फटका आजही हजारो ठेवीदारांना बसत आहे. संस्थेची परिस्थिती इतकी बिकट झाली की, शासनाने अखेर तिला अवसायक (लिक्विडेट) करण्याचा निर्णय घेतला. मात्र, त्या नंतरच्या काळात ठेवीदारांना त्यांच्या ठेव रकमांचा परतावा मिळणे जवळपास अशक्य ठरले आहे.

आजच्या घडीला केवळ सिंधुदुर्ग जिल्ह्यातील ठेवीदारांची रक्कम सुमारे १५ ते २० कोटी रुपये एवढी असून, एकूण राज्यभरातील ठेवी नव्वद कोटींच्या घरात असल्याचे समोर आले आहे. त्यावर व्याजासह ठेवीदारांचे दावे प्रलंबित असून, त्यातील अनेक ठेवीदार आता हयातही नाहीत. काहींचे वारसही उपलब्ध नसल्याने या प्रकरणाचे सोयरसुतक घेणारे कोणीच उरलेले नाही. ज्यांचे हक्क आजही जिवंत आहेत, त्यांनाही मूळ रक्कम मिळणे गुलबकावलीच्या फुलासारखे दुर्मिळ ठरत आहे. शासनाने अवसायक प्रक्रियेअंतर्गत काही रक्कम ठेवीदारांना दिली असली तरी, ती एकूण देणीच्या मानाने अत्यल्प आहे.

दरम्यान, ही संस्था सध्या न्यायालयीन प्रक्रियेत असून, मार्च २०२५ नंतर या खटल्याची मुदतवाढ सरकारी वकिलांनी घेतली नसल्याचे वृत्त आहे. त्यामुळे संस्थेच्या कारभाराकडे कोणाचेच लक्ष नसल्याची खंत ठेवीदारांमध्ये आहे. भुदरगड पतसंस्थेतील ठेवीदारांनी व्याजदर अधिक असल्याच्या आशेवर आपली आयुष्यभराची बचत येथे गुंतवली होती. पण आज त्या सगळ्या ठेवी कागदावरच्या आकड्यांमध्ये अडकून पडल्या आहेत. यात भर म्हणून, अवसायक कार्यालयात आता स्टाफ कपात सुरू करण्यात आली आहे. रेकॉर्ड सांभाळण्यासाठी ठेवलेल्या काही कर्मचाऱ्यांनाही कमी केले जात आहे. त्यामुळे उरलेला संपूर्ण कारभार केवळ काही कर्मचाऱ्यांच्या जीवावर चालत आहे.

या सर्व परिस्थितीत ठेवीदारांना त्यांच्या मूळ रक्कमेच्या प्रमाणात तरी काही दिलासा मिळावा, हीच मागणी आता ठेवीदार आणि त्यांचे कुटुंबीय करत आहेत. मात्र या दिशेने ना सरकारी वकिलांचे लक्ष आहे, ना लोकप्रतिनिधींचे. भुदरगड पतसंस्थेच्या ठेवीदारांसाठी न्याय आणि परतावा हे दोन शब्द आजही फक्त आश्वासनापुरतेच राहिले आहेत. सरकार आणि संबंधित यंत्रणांनी तातडीने लक्ष देऊन या ठेवीदारांना त्यांचा न्याय्य हक्क मिळवून द्यावा, अशी मागणी जिल्ह्यातून जोर धरत आहे.

# जानवली येथे दुचाकी आणि कारचा अपघात, पती-पत्नी जखमी



**कणकवली । प्रतिनिधी**

मुंबई-गोवा महामार्गावर जानवली येथील हॉटेल नीलम कंट्री साईड हॉटेलसमोर आज दुपारी १:२० वाजण्याच्या सुमारास दुचाकी व इर्टिगा कार यांच्यात अपघात झाला. यात दुचाकीवरील पती-पत्नी जखमी झाले आहेत. लोरे (ता. कणकवली) येथील सुभाष नारायण गुरव (वय ५४) हे टाटा शोरूम येथून हिरो होंडा पॅशन प्रो या दुचाकीला एचएसआरपी नंबर प्लेट बसवून नांदगावच्या दिशेने जाणाऱ्या लेनवर रस्ता ओलांडत होते. दरम्यान, नांदगावहून कणकवलीकडे येणाऱ्या इर्टीगा कारचा चालक कमलेश रामचंद्र नरे (४५, रा. कलमठ) यांची कार या दुचाकीला धडकली. ही धडक एवढी जबरदस्त होती की, दुचाकीवरील सुभाष गुरव यांच्या पत्नी संजीवनी सुभाष गुरव (५२) या रस्त्यावर फेकल्या गेल्या. त्यांच्या डोक्याला गंभीर दुखापत झाली असून त्यांना तातडीने रुग्णवाहिकेतून उपजिल्हा रुग्णालय कणकवली येथे उपचारासाठी दाखल करण्यात आले. वैद्यकीय अधिकाऱ्यांनी त्यांच्या डोक्याला दुखापत झाल्याचे सांगितले. सुभाष गुरव यांनाही उजव्या पायाला गुडघ्यात, हाताला आणि खांद्याला दुखापत झाली आहे.

पान १ वरून

## विजय कुमार सिन्हा यांच्या ताफ्यावर हल्ला

नागरिकांनी तुटलेल्या नाल्यावरून प्रशासनाविरोधात निदर्शने केली होती, आणि त्याचाच विपर्यास केला जातो आहे. याच दरम्यान बिहारमधील आणखी एका मतदारसंघात हिंसाचाराची नोंद झाली आहे. सारण जिल्ह्यातील मांझी विधानसभा मतदारसंघात सीपीआय (एमएल) लिबरेशनचे आमदार सत्येंद्र यादव यांच्या ताफ्यावर अज्ञात व्यक्तींनी हल्ला केला. पोलिसांनी सांगितले की, आमदार आणि त्यांच्या सहकाऱ्यांना कोणतीही दुखापत झालेली नाही. हल्ल्यातील असामाजिक घटक ओळखण्यासाठी तपास सुरू आहे.

बिहारमधील निवडणूक प्रक्रिया तापत चालली असताना, सलग दोन नेत्यांवर झालेल्या या हल्ल्यांच्या घटनांनी प्रशासनाच्या सुरक्षेवर प्रश्नचिन्ह निर्माण केलं आहे. निवडणूक आयोगाने आता या प्रकरणांकडे गंभीरतेने पाहत तातडीने अहवाल मागवला आहे.

## सावंतवाडीत वनविभागाच्या पथकासमोर ओंकार हत्तीला मारहाण

घटनेवर कारवाई न झाल्यास दशक्रोशीतून तीव्र आंदोलन छेडले जाईल आणि त्यातून कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाल्यास त्यास शासन जबाबदार राहील, असा इशारा गवंडे यांनी दिला आहे. या घटनेनंतर स्थानिक ग्रामस्थ आणि पर्यावरण प्रेमींकडून ओंकार हत्तीच्या सुरक्षेबाबत गंभीर चिंता व्यक्त केली जात आहे. वनविभागाने यावर तातडीने कारवाई करून दोषींना अटक करावी, अशी सर्वसामान्यांची मागणी होत आहे.

मागील महिनाभरापासून हा हत्ती मानवी वस्तीजवळ वावरत असतानाही, तो काहीसा 'माणसाळल्यासारखा' वागत असल्याचा गैरसमज बाळगून काही नागरिकांनी हे अघटित कृत्य केले असावे. एका गंभीर हल्ल्यात शेतकऱ्याचा जीव घेतलेला असतानाही, नागरिक त्याच्या अगदी जवळ जाण्याचे आणि त्याला मारहाण करण्याचे धाडस कसे करत आहेत, हा प्रश्न उपस्थित होत आहे.

ओंकार हत्तीने मनुष्यहानी केल्याचे सत्य माहीत असूनही, वनविभागाकडून त्याला पकडण्याच्या कार्यवाहीला इतका विलंब का होत आहे? असा संतप्त सवाल शेतकऱ्यांनी उपस्थित केला आहे. नागरिकांनी हत्तीला मारहाण करण्यासारखे गंभीर आणि धोकादायक कृत्य करणे, तसेच दुसरीकडे वनविभागाच्या कार्यवाहीतील दिरंगाई, या दोन्ही बाबी मनुष्य आणि वन्यजीव या दोघांसाठीही धोक्याची घंटा आहेत. वनविभागाने या गंभीर बाबीची तातडीने दखल घेऊन, हत्तीला पकडण्याची कार्यवाही त्वरित पूर्ण करावी, अशी मागणी जोर धरू लागली आहे.

## दोडामार्ग सीमेवर एका कारने चार वाहनांना ठोकरले; एक गंभीर जखमी

कारची धडक बसताच दुचाकीस्वार हवेत उसळून पडला, यात त्याचा उजवा पाय गंभीर जायबंदी झाला आहे. त्याला तातडीने येथील ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले. प्राथमिक उपचारानंतर त्याला पुढील उपचारांसाठी गोवा येथील अजिलो रुग्णालयात पाठवण्यात आले आहे. अपघातग्रस्त कारमधील चालकाचे डोके स्टेअरिंगवर आपटले आणि तो किरकोळ जखमी झाला. स्वतः जखमी झालेला असतानाही, या चालकाने जीवाची तमा न बाळगता इतर प्रवाशांच्या मदतीने कारमधील सर्व प्रवाशांना सुरक्षितपणे बाहेर काढले. अपघातामध्ये दोन्ही कारच्या दर्शनी भागाचे मोठे नुकसान झाले आहे, तर दुचाकींचेही मोठे नुकसान झाले आहे.

## रेल्वे कर्मचाऱ्यांच्या आंदोलनाचा मोठा फटका; लोकलनं चार प्रवाशांना उडवलं!

शिवाजी महाराज टर्मिनस रेल्वे स्थानकावर स्थानकात उभ्या राहिल्या. त्यामुळं जवळपास ४० मिनिटे मध्य रेल्वेच्या वाहतुकीवर परिणाम झाल्याचं पाहायला मिळाले.

**प्रवासी संघटनांचा संताप :**

दरम्यान, रेल्वे कर्मचाऱ्यांचे आंदोलन विरोधात आता प्रवासी संघटनांनी संताप व्यक्त केला असून, रेल्वे कर्मचारी संघटना नेहमीच प्रवाशांना वेठीस धरतात. मोटरमनची चूक असेल आणि प्रशासनानं कारवाई केली तरी आंदोलन करतात. लोकल बंद करण्याची धमकी देतात. आज देखील तेच झाले. लोहमार्ग पोलिसांनी रेल्वे अभियंत्यांवर गुन्हा दाखल केल्याने आज आंदोलन केले आणि अचानक लोकल बंद केल्या. याचा फटका लाखो प्रवाशांना बसला. रेल्वे कर्मचाऱ्यांवर गुन्हे दाखल करायचेच नाहीत असा या रेल्वे युनियनचा पवित्रा असतो, अशी प्रतिक्रिया प्रवासी संघटनेचे अध्यक्ष सुभाष गुप्ता यांनी दिली आहे. दुसरीकडे, रेल्वे प्रशासनाचे रेल्वे युनियनसोबत बोलणं सुरू असून, कर्मचाऱ्यांच्या मागण्यांवर चर्चा सुरू आहे. अशी माहिती मध्य रेल्वेचे मुख्य जनसंपर्क अधिकारी डॉक्टर स्वप्नील नीला यांनी दिली आहे.

कर्मचाऱ्यांच्या आंदोलनामुळं छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस रेल्वे स्थानकावर मोठ्या प्रमाणात गर्दी निर्माण झाली आहे. त्यामुळं लोकांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. अशातच लोकल सेवा विस्कळीत झाल्यामुळं काही प्रवासी रेल्वे रुळावरूनच चालत जात होते. मध्य रेल्वेच्या मस्जिद बंदर-सँडहर्स्ट रोड रेल्वे स्थानकादरम्यान काही प्रवासी रेल्वे रुळावरून चालू लागले. हे प्रवासी सँडहर्स्ट रोड रेल्वे स्थानकादरम्यान पोहोचले असता, मागून अंबरनाथ फास्ट लोकल आली आणि या लोकलनं रुळावरून चालणाऱ्या चार प्रवाशांना उडवलं.

# सिंधुदुर्ग निवडणूकीत भाजप-शिंदे गटात 'स्वबळा'ची तयारी

**सावंतवाडी । प्रतिनिधी**

सिंधुदुर्ग जिल्ह्यातील सावंतवाडी, वेंगुर्ले, मालवण नगरपरिषद आणि कणकवली नगरपंचायत सार्वत्रिक निवडणुकीमुळे राजकीय वातावरण तापले आहे. लोकसभा आणि विधानसभा निवडणुकीप्रमाणे स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीतही भाजप आणि शिवसेना (शिंदे गट) यांची 'महायुती' होईल, अशी चर्चा होती. मात्र, आता भाजपने 'स्वबळा'चा नारा दिल्याने जिल्ह्यात भाजप, शिवसेना (शिंदे गट) आणि उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेना अशी तिरंगी लढत होण्याची दाट शक्यता निर्माण झाली आहे.

बुधवारी सावंतवाडी येथे झालेल्या भाजपच्या मेळाव्यात पक्षाचे प्रदेशाध्यक्ष आमदार रवींद्र चव्हाण यांनी स्पष्ट केले की, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका पूर्ण ताकदीने भाजपच्या चिन्हावर लढवण्याचा पक्षाचा निर्धार आहे. यावेळी विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर आणि पालकमंत्री नितेश राणे हेही उपस्थित होते. पालकमंत्री नितेश राणे यांनीही मैत्रिपूर्ण लढत होईल असे म्हटले आहे.भाजपने स्वबळावर लढण्याचा पवित्रा घेतल्या मुळे महायुतीच्या चर्चांना पूर्णविराम मिळाला आहे. यापूर्वी शिवसेना (शिंदे गट) चे नेते, उद्योगमंत्री उदय सामंत, आमदार दीपक केसरकर आणि आमदार निलेश राणे यांनी महायुतीसाठी बोलणी करण्याची तयारी दर्शवली होती. आज आमदार दीपक केसरकर यांनी त्यांची भूमिका स्पष्ट करताना म्हटले आहे की, त्यांनी आणि आमदार निलेश राणे यांनी युतीसाठी 'अॅडजेस्टमेंट' करण्याची तयारी ठेवली होती. परंतु, भाजपला स्वबळावर लढण्याची इच्छा असेल, तर शिवसेनाही (शिंदे गट) स्वबळावर निवडणूक लढवण्यास तयार आहे. यावेळी त्यांनी सावधगिरीचा इशारा देत म्हटले आहे की, जर या दुफळीचा फायदा उबाठा (उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेना) गटाला झाला, तर त्याची जबाबदारी भाजपने घ्यावी लागेल. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका मोठ्या कालावधीनंतर होत असल्या मुळे इच्छुकांची संख्या वाढली आहे. या पार्श्वभूमीवर बंडखोरी रोखण्यासाठी पालकमंत्री नितेश राणे यांनी 'मैत्रीपूर्ण लढत' करण्याचे सुतोवाच केले आहे. तर, आमदार दीपक केसरकर यांनीही 'मैत्रीपूर्ण' किंवा 'स्वबळा'वर निवडणूक झाली तरी, उबाठाला फायदा होणार नाही याची खबरदारी घेणे आवश्यक असल्याचे मत व्यक्त केले आहे.

आता खासदार नारायण राणे यांची या संपूर्ण प्रकरणातील भूमिका काय असेल, याकडे जिल्ह्याचे लक्ष लागले आहे. दरम्यान शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे, काँग्रेस आणि राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्ष यांच्यातील महाविकास आघाडीचा फॉर्मुला अद्याप तरी समोर आलेला नाही. त्यामुळे उध्दव ठाकरे शिवसेना पक्ष ताकदीने लढण्याची शक्यता आहे.

# दापोलीत अवैध वाळू साठा जप्त; दोन आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल

**रत्नागिरी । प्रतिनिधी**



दापोली तालुक्यात महसूल विभागाने अवैध गौण खनिज वाळू उपसा आणि साठ्याविरुद्ध मोठी कारवाई केली आहे. येथील अडखळ खाडी किनारी आणि अडखळ (म्हैसौंडे) परिसरात सुमारे अडीच लाख रुपये किंमती ची २५ ब्रास वाळू कायदेशीर परवान्याशिवाय साठवून ठेवल्याचे उघड झाले आहे. याप्रकरणी दोन आरोपींविरुद्ध भारतीय न्यायसंहिता आणि खाण व खनिज कायद्यानुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मंडळ अधिकारी, हर्णे तहसील कार्यालयाचे विनोद ज्ञानदेव जाधव (वय ४६) यांनी यासंदर्भात फिर्याद दिली आहे. त्यांच्या फिर्यादीनुसार, दि. २१/१०/२०२५ रोजी दोन वेगवेगळ्या वेळी ही अवैध वाळू साठ्याची कृती निदर्शनास आली. सर्वप्रथम दुपारी २ वाजून १५ मिनिटांनी मौजे अडखळ खाडी किनारी आणि त्यानंतर त्याच दिवशी दुपारी ३ वाजता मौजे अडखळ (म्हैसौंडे) खाडी किनारी हा वाळूचा साठा आढळून आला.

या घटनेची नोंद दि. ०४/११/२०२५ रोजी रात्री ६ वाजून ४१ मिनिटांनी करण्यात आली आहे. या प्रकरणात गु.र.नं. २०२/२०२५ नुसार भारतीय न्यायसंहिता अधिनियम २०२३ चे कलम ३०३(२) (चोरी) आणि खाण आणि खनिज (नियमन आणि विकास) अधिनियम १९५७ चे कलम २१ (अवैध उत्खनन व वाहतुकीबद्दल दंड) या प्रमुख कलमां खाली गुन्हा दाखल करण्यात आला आहे. फैयाज महामूद खांचे (रा. अडखळ, ता. दापोली) आणि सैजाद मैनुद्दीन काझी (रा. अडखळ, ता. दापोली) या दोन आरोपींविरुद्ध ही कारवाई करण्यात आली आहे. आरोपींच्या ताब्यात वाळू उत्खनन करण्याचा कोणताही परवाना (लायसन्स) किंवा वैध रॉयल्टी पावती नसताना गौण खनिजाचा हा अवैध वाळू साठा आढळून आला. महसूल विभागाने जप्त केलेल्या एकूण वाळू साठ्याची किंमत सुमारे २,५०,०००/- रुपये इतकी आहे. अवैध वाळू उपसा करणाऱ्यांवर प्रशासनाकडून सातत्याने कारवाई केली जाईल, असा इशारा महसूल अधिकाऱ्यांनी दिला आहे.

# बांद्यात उड्डाणपुलाखाली भरधाव कॅन्टरच्या धडकेत महिला ठार

**बांदा । वार्ताहर**



बांदा शहरात उड्डाणपुलाखालील श्रीराम चौकात भरधाव वेगात आलेल्या कॅन्टरने दुचाकीला जोरदार धडक दिल्याने झालेल्या भीषण अपघातात दुचाकीवर पाठीमागे बसलेल्या रजनी रामकृष्ण गावडे (वय ३९, रा. घारपी) या महिलेचा उपचारादरम्यान मृत्यू झाला. हा अपघात आज (गुरुवार) सकाळी पावणेदहा वाजण्याच्या सुमारास घडला होता आणि गोवा बांबोळी रुग्णालयात उपचार सुरु असताना सायंकाळी उशिरा त्यांची प्राणज्योत मालवली.

रजनी गावडे या त्यांच्या पतीसोबत बचतगटाच्या बैठकीसाठी बांद्याहून दोडामार्गच्या दिशेने दुचाकीवरून जात होत्या. याचवेळी दोडामार्गहून भरधाव वेगात बांदा शहरात येत असलेल्या कॅन्टरने श्रीराम चौकात त्यांच्या दुचाकीला जोरदार धडक दिली. या धडकेत दुचाकीच्या पाठी मागे बसलेल्या रजनी गावडे या रस्त्यावर आदळल्याने गंभीर जखमी झाल्या. त्यांच्या डाव्या पायावरून कॅन्टरचे चाक गेल्याने त्यांना मोठी दुखापत झाली होती.

अपघात झाल्यानंतर कॅन्टर चालक घटनास्थळावरून पळून जाण्याचा प्रयत्न करत होता, मात्र परिसरातील जागरूक नागरिकांनी तत्परता दाखवत त्याला शिताफीने पकडले आणि पोलिसांच्या ताब्यात दिले. या अपघातामुळे श्रीराम चौकात मोठी वाहतूक कोंडी झाली होती, ती पूर्ववत करण्यासाठी पोलिसांना प्रयत्न करावे लागले.

गंभीर जखमी झालेल्या रजनी गावडे यांना स्थानिकांनी तातडीने उपचारासाठी बांदा प्राथमिक आरोग्य केंद्रात दाखल केले. वैद्यकीय अधिकारी डॉ. गजानन सारंग यांनी त्यांच्यावर प्राथमिक उपचार केले, परंतु त्यांची प्रकृती गंभीर असल्याने त्यांना अधिक उपचारांसाठी गोवा बांबोळी रुग्णालयात हलवण्यात आले. त्याठिकाणी अतिदक्षता विभागात उपचार सुरू असताना आज सायंकाळी उशिरा त्यांची प्राणज्योत मालवली.

## वेंगुर्ला नगरपरिषद, वेंगुर्ला (जाहीर प्रकटन)

### तालुका - वेंगुर्ला, जिल्हा - सिंधुदुर्ग


**जा.क्र/वेंनप/कार्या- १०/४१४५/२०२५** **दि. ०३/११/२०२५**

ज्याअर्थी खराब रस्ते व रस्त्यांवरील खड्डे यांमुळे होणारे अपघात व मृत्यू याबाबत मा.मुंबई उच्च न्यायालयात जनहित याचिका क.७१/२०१३ दाखल करण्यात आली होती. सदर जनहित याचिकेची सुनावणी दि.१३/१०/२०२५ रोजी संपन्न झाली असून सदर सुनावणी दरम्यान मा. उच्च न्यायालयाने आदेश पारित केले आहेत. त्यानुसार नगरपरिषद क्षेत्रात रस्त्यांवरील खड्यांबाबत प्राप्त होणाऱ्या तक्रारींवर कार्यवाही करण्यासाठी तसेच खड्यांमुळे मृत्युमुखी अथवा अपघातग्रस्त नागरिकांना नुकसान भरपाई देणेबाबत कार्यवाही करण्याच्या दृष्टीने समितीची स्थापना करणेबाबत निर्देश दिले आहेत. त्यानुसार वेंगुर्ला नगरपरिषद, वेंगुर्ला जि. सिंधुदुर्ग हद्दीतील नगरपरिषद मालकीचे व अखत्यारीत रस्त्यावरील खड्डयांमुळे मृत्युमुखी पडलेल्या अथवा अपघातग्रस्त नागरिकांना नुकसान भरपाई देणेबाबत कार्यवाही करण्याच्या दृष्टीने जनहित याचिका ७१/२०१३ च्या अनुषंगाने मा. मुंबई उच्च न्यायालयाने दिलेल्या निर्देशांनुसार खालील प्रमाणे समिती गठीत करीत आहे.

| अ.क्र. | पदनाम | पद |
|---|---|---|
| १. | मुख्याधिकारी, वेंगुर्ला नगरपरिषद, वेंगुर्ला | सदस्य |
| २. | सचिव, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, सिंधुदुर्ग | सदस्य |

तरी वेंगुर्ला नगरपरिषद, वेंगुर्ला जि.सिंधुदुर्ग हद्दीतील नगरपरिषद मालकीचे व अखत्यारीत रस्त्यावरील खड्डयांबाबत वेंगुर्ला नगरपरिषद कार्यालयात https://mahaulb.in/MahaULB या ई.मेल आयडीवर तक्रार दाखल करता येईल.

सही/- (हेमंत किरूळकर)
मुख्याधिकारी, वेंगुर्ला नगरपरिषद
ता.वेंगुर्ला, जि.सिंधुदुर्ग



पान १ वरून..

## मंगळसूत्र चोरीप्रकरणी शिर्डी येथील संशयितास न्यायालयीन कोठडी

मनोज परुळेकर आदीच्या पथकाने संशयितास ताब्यात घेऊन आज न्यायालयात हजर केले. याप्रकरणी पोलीस हवालदार भगवान चव्हाण व महिला पोलीस हवालदार दिपा मठकर पुढील तपास करीत आहेत. वेंगुर्ला पोलिसांच्या या कामगिरीचे शहरातून कौतुक होत आहे.

## ग्रामपंचायत केरवडे तर्फ माणगाव तालुका - कुडाळ, जिल्हा - सिंधुदुर्ग

### जाहिर निविदा

केरवडे तर्फ माणगाव ग्रामपंचायत कार्यक्षेत्रातील व कार्यक्षेत्राबाहेरील सर्व नोंदणीकृत मक्तेदार यांस कळविण्यात येते की, केरवडे तर्फ माणगाव येथे खालीलप्रमाणे विकास काम करावयाचे असून त्यासाठी मक्तेदार यांसकडून निविदा मागविण्यात येत आहेत.

| अ.क्र. | कामाचा तपशिल | योजनेचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम | निविदा रक्कम | बयाणा रक्कम | टेंडर फॉर्म फी | कोऱ्या निविदा मिळण्याची तारीख | निविदा स्विकारण्याची अंतिम तारीख | निविदा उघडण्याची तारीख व वेळ | कामपुर्ण करण्याचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | केरवडे तर्फ माणगांव घाडीवाडी मुख्य रस्ता ते मांडकुली कुलदेवता मंदिर भोईवाडी मार्गे मांडकुली हायस्कूल पर्यंत जाणारा रस्ता तयार करणे. ता.कुडाळ | जनसुविधा सन २०२५-२६ | ७९९८५९/- | ७२०३०७/- | ७२०३/- | २००/- | ०७/११/२०२५ ते १३/११/२०२५ दुपारी १२.०० वाजेपर्यत | १३/११/२०२५ दुपारी ०३.०० वाजेपर्यत | १४/११/२०२५ सकाळी ११.०० वाजता | ५ महिने |


सदर काम ज्या मक्तेदारांना करावयाचे असेल त्यांनी कामाची मागणी ग्रामपंचायत कार्यालयात सिलबंद लखोट्यात सादर करावयाची आहे. सदरची निविदा दि. १४/११/२०२५ रोजी सकाळी ११.०० वाजता ग्रा. पं. कार्यालयात मा. सरपंच यांच्या उपस्थितीत उघडण्यात येईल. बयाणा रक्कम ग्रामपंचायत खाते क्र. ०६७४००००००००२८६ सिंधुदुर्ग जिल्हा मध्यवर्ती सह बँक लि. शाखा तुळसुली तर्फ माणगाव मध्ये जमा करावे.

निविदेसंदर्भात सविस्तर अटी शर्ती ग्रा.पं. कार्यालयात कार्यालयीन वेळेत सुट्टीचे दिवस वगळून पहावयास मिळतील.

**जावक क्र. २०७/२०२५/२६**
**दि. ०६/११/२०२५**

सही/- सरपंच
ग्रामपंचायत केरवडे तर्फ माणगाव
ता.कुडाळ जि.सिंधुदुर्ग

## थोडक्यात



### समुद्रात बुडणाऱ्या तरुणाला वाचवले

**रत्नागिरी । प्रतिनिधी**

तालुक्यातील गणपतीपुळे येथे बुधवारी खानापूर (ता. विटा, जि. सांगली) येथील २५ वर्षीय तरुणाला समुद्रात बुडताना वाचविण्यात यश आल्याची माहिती समुद्रकिनाऱ्यावरील मोरया वॉटर स्पोर्ट व्यावसायिक आणि जीवरक्षकांकडून देण्यात आली. शशांक धीरेंद्र कुलकर्णी असे वाचविण्यात आलेला या तरुणाचे नाव आहे. ही घटना बुधवारी दुपारी एक वाजण्याच्या सुमारास घडली.

याबाबत अधिक माहिती अशी की, खानापूर येथील सहा तरुण मित्र देवदर्शन आणि पर्यटनासाठी गणपतीपुळे येथे आले होते. सर्व जण समुद्रात आंघोळीसाठी उतरले होते. यातील शशांक कुलकर्णी हा समुद्राच्या खोल पाण्यात गेल्यानंतर अडकला. त्याच्या मित्रांनी आरडाओरडा केल्याने समुद्रकिनाऱ्यावर असलेल्या मोरया वॉटर स्पोर्ट व्यावसायिकांचे कर्मचारी आपल्या जेस्की बोटीने तत्काळ संबंधित तरुण बुडत असलेल्या दिशेने धावले. खोल पाण्यात बुडत असलेल्या शशांकला त्यांनी सुखरूपरीत्या पाण्याबाहेर आणले.मोरया वॉटर स्पोर्टचे कर्मचारी कैलास किशोर शितप आणि आरिफुल यांनी धाडसाने शशांकचे प्राण वाचवले. त्यांना गणपतीपुळे ग्रामपंचायतचे जीवरक्षक यांची मोलाची मदत प्राप्त झाली.

### कुणकवळे येथील श्री दुर्गादेवीचा शनिवारी जत्रोत्सव

**मालवण । वार्ताहर**



मालवण तालुक्यातील कुणकवळे येथील श्री दुर्गादेवीचा वार्षिक जत्रोत्सव शनिवार दि. ८ नोव्हेंबर २०२५ रोजी आयोजित करण्यात आला आहे. भक्ताच्या हाकेला धावणारी आणि नवसाला पावणारी अशी ख्याती असणाऱ्या कुणकावळे येथील श्री दुर्गादेवीच्या वार्षिक जत्रोत्सवास सिंधुदुर्ग जिल्ह्यातील भाविक मोठ्या संख्येने उपस्थित राहतात. शनिवारी दुपारी २ वाजता श्री दुर्गादेवीची मानकऱ्यांच्या हस्ते विधिवत पूजा करून खण नारळाची ओट्या भरल्यानंतर भाविकांच्या दर्शनाचा व ओट्या भरण्याच्या कामास सुरुवात होणार आहे रात्री पावणेबारा वाजता पालखी सोहळ्यास सुरुवात होणार असून त्यानंतर बाळकृष्ण गोरे दशावतार नाट्य मंडळाचा नाट्य प्रयोग होणार आहे.

### समुद्रात बेपत्ता झालेल्या तरुणाचा १० दिवसांनंतरही शोध लागला नाही

**रत्नागिरी । प्रतिनिधी**



तालुक्यातील गणपतीपुळे समुद्रामध्ये २५ ऑक्टोबर रोजी बेपत्ता झालेल्या नितीन शंकर पवार (३५) यांचा दहा दिवसांनंतरही शोध लागलेला नाही. गणपतीपुळे आणि जयगड पोलिस नेवरे ते जयगड बोटीने रात्रंदिवस शोधमोहीम राबवत आहेत.

अजून यश आलेले नाही. गणपतीपुळेत आपल्या कुटुंबासोबत पर्यटनासाठी आलेल्या नितीन शंकर पवार (रा. अमरापूर, पेण) २५ ऑक्टोबरला सायंकाळी स्नानासाठी समुद्रात उतरले. सुमारे साडेपाच वाजण्याच्या दरम्यान ते समुद्राच्या पाण्यात ओढले जाऊन बेपत्ता झाले. मच्छीमार बांधवांच्या मदतीने समुद्रामध्ये शोधमोहीम सुरू आहे. मात्र दहा दिवस झाले तरी नितीन पवार यांचा शोध लागलेला नाही.

---

सुशेगात असलेल्या सत्ताधाऱ्यांना जाग आणण्यासाठी केले जनआंदोलन

# खड्डेमय राज्यमार्गावर शिवसेनेचे बैलगाडी आंदोलन !

**कुडाळ । प्रतिनिधी**

कुडाळ-मालवण या प्रमुख राज्य मार्गावर मोठ्या प्रमाणात पडलेल्या खड्डयांच्या निषेधार्थ आज माजी आमदार वैभव नाईक यांच्या नेतृत्वाखाली शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीने होबळीचा माळ येथे जनआंदोलन छेडण्यात आले. या आंदोलनाला कुडाळ मालवण वासीयांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. या रस्त्यावरून बैलगाडी चालवत नेऊन आणि महायुती सरकार विरोधी घोषणा देऊन जनतेला खड्ड्यात घालणाऱ्या सत्ताधाऱ्यांचा निषेध करण्यात आला.

जनता खड्यात सत्ताधारी सुशेगात, खड्डयांमधून महायुती सरकार अजून किती बळी घेणार, कुडाळचे आमदार मुंबईत व्यस्त कुडाळ मालवणची जनता खड्डयांनी त्रस्त, अधिकारी तुपाशी जनता खड्डयाशी अशा आशयाचे फलक यावेळी झळकविण्यात आले.

कुडाळ मालवण हा प्रमुख राज्यमार्ग असून गेल्या सहा महिन्यांपासून हा रस्ता पूर्णतः खड्डेमय झाला आहे. वाहन चालकांसाठी तो मृत्यूचा सापळा बनला आहे. या रस्त्यावरून प्रवास करताना वाहन चालकांना कसरत करावी लागत असून रस्त्यावरून चालणे देखील नागरिकांना मुश्कील झाले आहे.या






रस्त्यावर वारंवार अपघात होऊन नागरिक गंभीर जखमी होत आहेत.मात्र स्थानिक आमदार, खासदार, पालकमंत्री हे सुशेगात असून कुडाळ मालवण वासिय नागरिकांच्या जीविताची त्यांना कोणतीही फिकीर नाही. त्यामुळे सुशेगात असलेल्या स्थानिक आमदार, खासदार, पालकमंत्री आणि महायुती सरकारला जाग आणण्यासाठी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीने हे आंदोलन छेडण्यात आले.

यावेळी माजी आमदार वैभव नाईक म्हणाले, मी आमदार असताना आवश्यक निधी मंजूर करून हा कुडाळ मालवण रस्ता सुस्थितीत ठेवण्याचा प्रयत्न केला होता. परंतु महायुती सरकार आल्यानंतर गेल्या साडेतीन वर्षात कुठलाही निधी या रस्त्यावर खर्च झाला नाही.त्यामुळे हा रस्ता पूर्णतः खड्डेमय झाला असून सातत्याने अपघात घडत आहेत. लोक मृत्युमुखी पडत आहेत जखमी होत आहेत. हा एकच रस्ता नाहीतर कसाल-मालवण, कणकवली-आचरा, आचरा-मालवण, कवठी, चेंदवण, माणगाव हे सगळे रस्ते खड्डेमय झाले आहेत. मात्र सत्ताधारी लोकप्रतिनिधींना या रस्त्यांकडे लक्ष द्यायला वेळ नाही. स्थानिक आमदार निलेश राणे हे मालवण वरून कुडाळला जायचं असेल तर हायवेवरून जातात परंतु कुडाळ मालवण रस्त्याने ते जात नाहीत हे त्यांच्याकडे असलेल्या एका पोलीस बॉडीगार्डने मला सांगितले.त्यामुळे रस्ता दुरुस्त करण्याऐवजी आमदार पळवाट काढत आहेत. जनता त्रस्त झाल्याने आम्ही जनतेसाठी हे आंदोलन केले परंतु आता आमच्यावरच गुन्हे दाखल केले जातील.परंतु जनतेचा आवाज उठवण्याचे काम आम्ही सातत्याने करत राहणार आहोत. माझी स्थानिक आमदार, खासदार आणि पालकमंत्री यांना विनंती आहे की त्यांनी हिंदुत्वाचा विषय घ्यावा, उद्धवजी ठाकरेंवर टीका करावी आमच्यावर टीका करावी, मतांची देखील चोरी करावी परंतु आमदार, खासदार, पालकमंत्र्यांना जेव्हा कधी वेळ असेल तेव्हा त्यांनी या कुडाळ-मालवण रस्त्यावरून प्रवास करावा आणि ज्या लोकांनी तुम्हाला निवडून दिले ते लोक सुरक्षित राहिले पाहिजे असे तुम्हाला वाटले तर हा रस्ता लवकरात लवकर सुस्थितित करावा असा विनंतीवजा टोला वैभव नाईक यांनी लगावला.

यावेळी अमरसेन सावंत, मंदार शिरसाट, हरी खोबरेकर, राजन नाईक, नितीन वाळके, बाबी जोगी, पराग नार्वेकर, सुशील चिंदरकर, शेखर गावडे, विनय गावडे, गंगाराम सडवेलकर, समीर लब्दे, विजय पालव, नितीन सावंत, अमित भोगले, संदीप म्हाडेश्वर, अमित राणे, बाबू टेंबुलकर, वंदेश ढोलम, शिवा भोजने, दर्शन म्हाडगूत, रुपेश वर्दम, महेंद्र म्हाडगूत, हेमंत मोंडकर, तपस्वी मयेकर, उमेश मांजरेकर, दीपक देसाई, नरेश हुले, मंगेश बांदेकर, रुपेश वाडयेकर, गौरव वेर्लेकर, बंड्या सरमळकर, विनोद सावंत, उमेश प्रभू, शंभू नाईक, प्रवीण नेरुरकर, संतोष कुडाळकर, अजित हडकर, गोटू नाईक, देविदास नाईक, दाजी नाईक, सुनील करवडकर, मंगेश नारिंगेकर, दीपेश कदम, राजू परब, मोनिका म्हापणकर, सुजाता परब, जागृती भोले, दीपिका म्हापणकर, मालती परब, दिव्या परब, राजश्री म्हापणकर, गौरी परब, मितालि कदम, स्मिता म्हापणकर, हर्षदा मालवणकर, ममता परब, साक्षी परब, प्रज्ञा परब, समीक्षा परब, साधना चव्हाण, अनिता परब, कोमल मालवणकर, शिवनंदन प्रभू, राहुल सावंत, उमेश चव्हाण, बाबू कांबळी, नितीन राऊळ आदीसह शिवसेना पदाधिकारी शिवसैनिक व कुडाळ मालवण वासीय मोठ्या संख्येने उपस्थित होते.

---

## कालावल खाडीतील वाळू उत्खननामुळे पूल धोक्यात

### संबंधितांवर कारवाई व्हावीः अनिल मसुरकर यांची मागणी..

**कालावल । वार्ताहर**

कालावल खाडीत यांत्रिक मशीनद्वारे वाळू उत्खनन न करण्याचे उच्च न्यायालयाचे आदेश असतानाही ते आदेश पायदळी तुडवून थेट पोकलेन मशीन उतरवून परवानगी नसतानाही मोठ्या प्रमाणात वाळू उत्खनन सुरू आहे. त्यामुळे कालावल पूल धोक्यात आला आहे. वाळू माफियांना शोधून त्यांच्यावर मकोका कायद्यांतर्गत कठोरात कठोर कारवाई करावी आणि अनधिकृत वाळू उत्खननासाठी वापरण्यात आलेले पोकलेन जप्त करावे, अशी मागणी मसुरे कावावाडी येथे राहणारे अनिल अच्युत मसुरकर यांनी राज्य लोकायुक्तांना पत्र लिहून केलेली आहे.

अवैध वाळू उत्खनन बाबत तेथील प्रशासनातील कर्मचाऱ्यांची चौकशी करून दोषी कर्मचाऱ्यांवर कठोर कारवाई करावी, अशीही मागणी अनिल मसुरकर यांनी केली आहे. मी



स्वतः अपंग असून माझे वय ६७ वर्षे आहे आणि २००९ पासून वाळू माफियाविरुद्ध मी लढा देत असल्यामुळे माझ्या जीवाला धोका आहे, असेही मसुरकर यांनी पत्रात नमूद केले आले.

तसेच खोत जुवा ग्रामस्थ मंडळानेही कालावल खाडीपात्रातील अतिसंवेदनशील गट-बी व उपगट बी-४ व बी-५ या वाळू गटांचे लिलाव न होण्यासाठी जिल्हाधिकाऱ्यांना ३१ ग्रामस्थांच्या सह्यांचे निवेदन २४ ऑक्टोबर रोजी दिले आहे. कालावल खाडीपात्र परिसरात संवेदनशील अशी परंपरागत मनुष्यवस्ती, जैवविविधतेने असणारी बेटे आहेत. वाळू उत्खननामुळे या भागातील जैवविविधता नष्ट होणार असून पांडवकालीन बंधाराही नष्ट होणार असल्यामुळे वाळू गटांचे लिलाव रद्द करून सध्या सुरू असलेलं अनधिकृत वाळू उत्खनन त्वरित थांबवावं, अशी. मागणी ग्रामस्थ मंडळाने केली आहे.

हडी कोथेवाडी येथील रहिवासी जनार्दन मधुसुदन शेडगे यांनी आपल्या सर्व्हे नं. २३ (८३) हिस्सा नं. १६२/१ ते २/५, वडिलोपार्जित जमिनीत अनधिकृतपणे उपसा केलेली वाळू बेकायदेशीररित्या साठवली जाते, अशी तक्रार मसुरकर यांनी मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, महसूलमंत्री, जिल्हाधिकारी, तहसीलदार, जिल्हा खनिकर्म अधिकारी आदींकडे पत्राद्वारे केली आहे.

## भाजपाच्या स्वबळाच्या घोषणेनंतर पुन्हा कणकवलीत शहर विकास आघाडीचे वारे

**सावंतवाडी । प्रतिनिधी**

नुकत्याच सावंतवाडी येथे झालेल्या सिंधुदुर्ग जिल्हा भाजपाच्या बैठकीनंतर भाजपाच्या नेत्यांकडून स्वबळाचे संकेत देण्यात आल्यानंतर कणकवली नगरपंचायत निवडणुकी करिता घडामोडींनी पुन्हा वेग घेतला आहे. भाजपाच्या या स्वबळाच्या घोषणेनंतर पुन्हा एकदा कणकवली शहरात शहर विकास आघाडीचे वारे जोर धरू लागले आहेत. यात भाजपा पक्षप्रवेशासंदर्भात तसेच नगराध्यक्ष पदाकरिताची बोलणी फिस्कटल्याने आता पुन्हा कणकवली शहर विकास आघाडी मध्ये संभाव्य होऊ घातलेली बहुधा राज्यातील पहिली युती होण्याच्या दृष्टीने पुन्हा पावले पडू लागली आहेत. सध्या पुन्हा सुरू झालेली ही बोलणी जर यशस्वी झाली तर लवकरच कणकवली शहराच्या राजकीय घडामोडींना वेग येत मोठा पक्षप्रवेश देखील होण्याची शक्यता आहे. शहर विकास आघाडी मधील एकत्र येऊ घातलेले दोन्ही पक्ष हे या अनुषंगाने हालचाली करत असल्याची माहिती सूत्रांकडून प्राप्त झाली आहे. त्यामुळे तगड्या नेत्याकडे नगराध्यक्ष पदाची उमेदवारीची धुरा सोपवत स्वबळाचा शहर विकास आघाडीच्या माध्यमातून सामना केला जाण्याची शक्यता आहे. उमेदवारी अर्ज दाखल करण्यास सुरुवात व्हायला अजून चार दिवस शिल्लक असताना त्या अगोदर कणकवली शहराच्या राजकारणात पडद्यामागे वेगवान घडामोडी घडत आहेत.

---

## नांदरुखच्या गिरोबाचा आज जत्रोत्सव

**कणकवली । भाई चव्हाण**

छत्रपती शिवाजी महाराजांच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या आणि मालवणसह आठ गावांचा अधिपती असलेल्या नांदरुखची ग्रामदेवता गिरोबाचा दहिकाला जत्रोत्सव शुक्रवार दि. ७ नोव्हेंबरला होत आहे. फटाक्यांच्या नयनरम्य आतषबाजीसाठी हा जत्रोत्सव सिंधुदुर्ग जिल्ह्यात नावाजला जातो. प्राचिन इतिहासानुसार नांदरुख गावची चतुर्सिमा ही मालवणसह देवबाग, तारकर्ली, वायरी, भुतनाथ, कुंभारमाट, घुमडे , आनंदव्हाळ , कातवण अशा पुर्वाश्रमीच्या १२ वाड्यांपर्यंत विस्तारली होती. पण कालोघ्यात अन्य ८ वाड्यांमध्ये आता स्वतंत्र ग्रामपंचायतींसह मालवण नगरपालिका झाली. अद्यापही सागरी किनाऱ्यावर वसलेल्या देवबागसह अन्य गावांतील मच्छिमार रापण संघ मत्सव्यसायात भरभराट व्हावी म्हणून नांदरुखच्या साळकुंभा चाळ्यास सालीना बकर्यांचा भक्ष्य देतात. छत्रपती शिवाजी महाराजांनी सिंधुदूर्ग दुर्ग हा जलदुर्ग बांधताना



नांदरुख गावात गिरोबा मंदिरानजिक बांधकाम कामगारांसाठी बाजारपेठ वसवली होती. तर मंदिरासमोर असलेल्या बारमाही तळीचा अभ्यास करून मागिल बाजूस घोड्यांना पाणी पिण्यासाठी तलाव बांधला. महाराजांची घोडेस्वारी नांदरुख गावातून मालवणपर्यंत होत होती. शिवकालीन इतिहास असलेल्या जत्रोत्सवात रात्रो १० वाजता पलिकडील वाडीतून श्रीच्या पालखीचे फटाक्यांच्या आतषबाजीत पारंपारिक ढोल ताशांच्या गजरात आगमन होते. पालखीचे आगमन मंदिरानजिक होताच शोभिवंत फटाक्यांची नयनरम्य आतषबाजी करण्यात येते. ती पाहण्यासाठी भाविक आबालवृद्धांची अफाट गर्दी जमते.

## पिंगुळी ग्रा.पं.च्या रॅलीतून स्वच्छतेचा संदेश

**पिंगुळी । वार्ताहर**

मुख्यमंत्री समृद्ध ग्राम पंचायत अभियान अंगर्गत आज पिंगुळी ग्राम पंचायतीच्या वतीने स्वच्छता रॅली काढण्यात आली. एका अर्थाने या रॅलीच्या माध्यमातून अभियानाची सुरुवात झाली असून या अभियानात पिंगुळी ग्राम पंचायत उल्लेखनीय कामगिरी बजावेल असा विश्वास सरपंच अजय आकरेकर यांनी व्यक्त केला. मुख्यमंत्री समृद्ध ग्राम पंचायत अभियानाला सुरुवात झाली आहे. त्या अभियान अंतर्गत सगळ्या ग्राम पंचायतीनी आपापल्या गावांमध्ये विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत. पिंगुळी ग्राम पंचायतीच्या वतीने स्वच्छता रॅली काढून या उपक्रमाची सुरुवात करण्यात



आली. वॉर्ड क्र. ३ च्या वतीने आकर्षक असा स्वच्छता रथ तयार करण्यात आला होता. त्या रथाच्याद्वारे हलत्या मॉडेल्सच्या माध्यमातून स्वच्छतेचा संदेश देण्यात आला होता. दोन मुलांनी डस्टबिनचे रूप घेऊन डस्टबिनचा उपयोग शिकवला. स्वच्छतेचा संदेश देण्यात आला. पिंगुळी म्हापसेकर तिठा ते राऊळ महाराज मठ आणि पुढे श्री रवळनाथ मंदिर या मार्गावर हि रॅली काढण्यात आली. पिंगुळी जिल्हा परिषद गुढीपुर शाळा येथील विद्यार्थी, बॅरिस्टर नाथ पै शिक्षण संस्थेतील विद्यार्थी या रॅलीमध्ये विविध ऐतिहासिक वेशभूषेत सहभागी झाले होते. पिंगुळी ग्राम पंचायतने यापूर्वी देखील विविध विविध अभियानामध्ये उल्लेखनीय कामगिरी केली आहे. त्यामुळे या अभियानात देखील पिंगुळी ग्रा. पं. ला बक्षीस मिळेल असा विश्वास सरपंच यांनी यावेळी व्यक्त केला. कुडाळचे गट विकास अधिकारी प्रफुल्ल वालावलकर म्हणाले, पिंगुळीला राऊळ महाराज यांचं अध्यात्मिक आणि ठाकर लोककलेसारख्या पारंपरिक कलेचे अधिष्ठान लाभल आहे. या अभियानात देखील पिंगुळी ग्रामपंचायत आपली यशाची परंपरा कायम राखेल असे गट विकास अधीकारी श्री. वालावलकर म्हणाले. यावेळी सरपंच अजय आकेरकर, उपसरपंच मंगेश मस्के, बीडीओ प्रफुल्ल वालावलकर, ग्राम विकास अधिकारी श्री. निवतकर, सेवानिवृत्त मुख्याध्यापक प्रशांत धोंड, सागर रणसिंग, ग्राम पंचायत सदस्य, कर्मचारी, ग्राम स्थ, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

---

## बांगड्यांचा भाव कोसळला - मच्छीमारांना पुन्हा आर्थिक वादळाचा तडाखा!

### मासे मिळाले तरी भाव नाही; सरकारने तत्काळ हस्तक्षेप करावा

**मालवण । वार्ताहर**

सिंधुदुर्ग किनारपट्टीवरील मच्छीमार पुन्हा एकदा बिकट परिस्थितीत सापडले आहेत. सलग महिनाभर वादळाच्या इशाऱ्यांमुळे समुद्रात जाणे बंद होते. अशा परिस्थितीत जीव धोक्यात घालून जे मच्छीमार मासेमारीसाठी समुद्रात उतरतात, त्यांनाही आता मासे मिळाले तरी भाव मिळत नाही अशी दयनीय अवस्था आली आहे. बांगड्या, सुरमई सारख्या प्रमुख माशांच्या भावात मोठी घसरण झाली असून, काही ठिकाणी तर माशांना कचऱ्याच्या दराने विकावे लागते आहे. यामुळे मच्छीमारांच्या नाराजीला ऊत आला आहे.

महिनाभर वादळ, बंदी, आणि समुद्रात धोका असतानाही आम्ही मासे मारी करतो. पण चार मासे मिळाले तरी योग्य भाव मिळत नाही. कोल्ड स्टोरेज



नसल्याने आम्ही मासे साठवूही शकत नाही. मग शेवटी ते स्वस्तात विकणे भाग पडते, अशी खंत स्थानिक मच्छी मारांनी व्यक्त केली. मच्छीमारांचे म्हणणे आहे की, मासे न मिळणे हे जसे एक संकट आहे, तसेच मासे मिळाल्यानंतरही भाव न मिळणे हे दुसरे अरिष्ट आहे. अशा वेळी सरकारने परिस्थितीचा अभ्यास करून मच्छीमारांना विशेष आर्थिक पॅकेज जाहीर करायला हवे. उसाला हमीभाव मिळतो, मग माशांना का नाही? असा प्रश्नही मच्छीमार संघटनांनी उपस्थित केला आहे. त्यांनी सांगितले की, वर्षभरातील परिस्थितीचा विचार करता, मच्छीमारांना मासेमारी करता येण्याचे दिवस फारच कमी असतात - मान्सून मधील बंदी, अचानक येणारी वादळे, उत्तर-दक्षिण दिशेकडून येणारे जोरदार वारे यामुळे समुद्रात उतरणे अशक्य होते. याशिवाय झार म्हणजेच जेली फिश मुळे होणारे नुकसान, केंड मासामुळे होणारे जाळ्याचे नुकसान, आणि कर्नाटकातील मालपे बंदरातील अजस्त्र बोटींकडून १२ नॉटिकल माईल्सच्या आरक्षित मर्यादेत एलईडी फिशिंग केल्याने स्थानिक मच्छीमारांच्या उत्पन्नावर गंभीर परिणाम होत आहे. कधी कधी या सगळ्यामुळे युद्धसमान परिस्थिती निर्माण होते आणि पुन्हा मासेमारी बंद ठेवावी लागते.

अशा वेळी वर्षभरात प्रत्यक्ष मासे मारी किती दिवस होते, त्यावर आधारित निकष ठरवून सरकारने मच्छीमारांसाठी स्थायी आर्थिक योजना आखली पाहिजे, अशी मागणी होत आहे. मासेमारी आता कृषी क्षेत्रात वर्गीकृत झाली असली तरी मच्छीमारांना कृषकांप्रमाणे सवलती, हमीभाव, विमा वा थकबाकीमाफीसारखी कोणतीही सुविधा मिळत नाही, ही मोठी तफावत आहे. काही होड्यांना एकदा भरपूर मासे मिळाले म्हणजे सरकारला वाटतं की सगळ्यांचा प्रश्न सुटला! पण ती दृष्टीच चुकीची आहे, असे मच्छीमार म्हणतात. त्यांच्या मते, मत्स्यव्यवसायावर खऱ्या अर्थाने धोरणात्मक चर्चा करण्याऐवजी तो केवळ निवडणुकीतील भाषणापुरता मुद्दा राहिला आहे. सरकारचा अभ्यासच नाही, आणि आमचे लोकप्रतिनिधी आमची भूमिका मांडण्यात असमर्थ ठरत आहेत, अशी कडवट टीका किनारपट्टीवरील मच्छी मारांकडून होत आहे. समुद्रात दररोज जीव धोक्यात घालून उपजीविका करणाऱ्या या मच्छी मारांना न्याय्य भाव आणि सुरक्षित भविष्य मिळवून देण्यासाठी शासनाने तातडीने पावले उचलणे अत्यावश्यक ठरले आहे.

## मालवण-तारकर्ली रस्त्याच्या दुर्दशेमुळे ग्रामस्थ संतप्त...

**मालवण । वार्ताहर**

अतिवृष्टीमुळे मालवण-तारकर्ली भागातील रस्त्यांच्या कडेला मोठ्या प्रमाणात झाडी वाढल्याने आणि भूमिगत वीजवाहिन्या टाकण्यासाठी खोदलेला रस्ता दुरुस्त न केल्या मुळे ग्रामस्थांमधून तीव्र संताप व्यक्त होत आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाकडे वारंवार तक्रार करूनही रस्त्याची दुरुस्ती न झाल्याने भाजप पदाधिकाऱ्यांसह स्थानिक ग्रामस्थांनी आज सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांची भेट घेतली. नोव्हेंबर अखेरपर्यंत रस्त्याची दुरुस्ती न केल्यास जनआंदोलन छेडण्यात येईल असा इशारा यावेळी देण्यात आला. याबाबतचे निवेदनही त्यांना सादर करण्यात आले. मालवण तारकर्ली-देवबाग रस्त्याच्या दुतर्फा अति पावसामुळे मोठ्या प्रमाणात झाडी वाढली आहे. याचा थेट परिणाम वाहतुकीवर होत असून पर्यटक आणि स्थानिकांना ये-जा करताना प्रचंड अडथळा होत आहे. झाडी वाढल्यामुळे रस्त्याच्या बाजूने वाहने घेणेही शक्य होत नाही. त्यामुळे ग्रामस्थांनी तातडीने झाडी तोडण्याची मागणी केली आहे. तीन गावांतील भूमिगत वीजवाहिन्यांसाठी वीज वितरण कंपनीने एप्रिल २०२५ मध्ये रस्त्याच्या बाजूने खोदकाम केले आहे. मात्र खोदलेल्या रस्त्याच्या बाजूने केबल टाकून झाले असले तरी रस्त्याची दुरुस्ती अद्याप झालेली नाही. याबद्दल कार्यालयाला लेखी निवेदन देऊनही फक्त तोंडी आश्वासन देण्यात आले आहे.